|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ८+९ सोमवार दि. २० फेब्रुवारी २०२३ ते रविवार दि. २६ फेब्रुवारी २०२३ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## पोलीस खात्यातील पत्नीने अचूक साधला नेम संशयी पतीचा तिने सुपारी देऊन केला गेम

सातारा/क्राईम रिपोर्टर

समाजातील पुरुषी मानसिकता महिलांसाठी खूप त्रासदायक ठरत असते. विवाहित पुरुष बाहेर एखाद्या महिलेशी अनैतिक संबंध ठेऊ शकतो, पण त्याची पत्नी कामावरून उशिरा आली तरी त्याला संशय येतो. साताऱ्यात पोलीस खात्यात असलेल्या एका महिलेच्या पतीचे बाहेर अनैतिक संबंध होते असे असताना तो मात्र बायको पोलीस खात्यात आहे. म्हणून तिच्यावर संशय घेऊन तिला मारहाण करायचा त्यामुळे ती त्याला कंटाळली होती. अखेर तिने ...पान २ वर

# जन्मदात्या बापाकडून रक्ताच्या नात्यावर प्रहार एकाने मुलीला तर दुसऱ्याने मुलाला केले ठार

अंबरनाथ/क्राईम रिपोर्टर

रक्ताची नाती जपताना प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून वागायचे असते. कारण शेवटी कुटुंब एकसंघ ठेवण्याची आणि समाजात कुटुंबाची इभ्रत राखण्याची राखण्याची जबाबदारी सर्वांचीच असते. पण आजकाल एकसंघ कुटुंबात कुठल्याना कुठल्या कारणावरून वाद विवाद होत असतात आणि या वादात माणसाला रक्ताच्या नात्याचाही विसर पडतो. कारण काही लोकांना स्वतःच्या रागावर संयम राखता येत नाही आणि रागाच्या भरात माणसाच्या हातून रक्ताच्या नात्याला डाग लावणाऱ्या घटना घडतात. यात जो कुटुंबप्रमुख असतो त्याची जबाबदारी मोठी असते. कारण त्याने आयुष्यभर कुटुंबासाठी कष्ट केलेले असतात, अशावेळी आपल्या पत्नीने आपल्या मुलांनी आपल्या मनासारखं वागाव, आपला मान राखावा, आपण सांगितलेले ऐकावे अशी प्रत्येक बापाची इच्छा असते. पण मुले असो कि पत्नी कधी कधी कुटुबंप्रमुखाच्या इच्छेविरुद्ध वागते, त्याचं ऐकत नाही, अशावेळी त्या कुटूंब प्रमुखाला राग येणे स्वाभाविक आहे. मात्र अशावेळी त्याचा संयम सुटला तर त्याच्या हातून काहीही घडू शकते. अशाच दोन भयंकर घटना समोर आल्या आहेत. अंबड शहरातील रामकृष्ण नगर भागात मुलगी बापाचे ऐकत नव्हती. लग्नाचा विषय काढला कि बापा सोबत भांडण करायची. कारण तिचे एका तरुणाशी प्रेम होते, पण बापाचा या प्रेमाला विरोध होता. पण मुलगी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. त्यामुळे बापाचा संयम सुटला आणि त्याने मुलीची गळा दाबून हत्या केली, तर अंबरनाथ येथील एका घटनेत पत्नीवरचा राग एका इसमाने आपल्या ११ वर्षाच्या मुलावर काढला आणि पोटच्या पोराची हत्या केली. या दोन्ही प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.



दुर्दैवी मयत आकाश आणि अटक नराधम बाप आनंद



मयत ज्योती

अंबरनाथ पश्चिम येथील स्वामी नगर भागात आनंद गणेशन हा इसम राहतो. आनंदचे त्याच्या पत्नीशी पटत नव्हते. दोघांमधील वाद विकोपाला गेल्याने त्याची पत्नी त्याच्या पासून वेगळी राहू लागली. पत्नी आपले ऐकत नाही. आपल्यापासून वेगळी राहते याचा आनंदला राग होता. याच रागातून त्याने आपला ११ वर्षाचा मुलगा आकाश हा मैदानात खेळत असताना त्याला आपल्या बरोबर नेले आणि त्याचा गळा चिरून त्याची निर्घुण हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह झोळीत टाकून नाल्यात फेकत असताना स्थानिकांनी त्याला रंगेहात पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानंतर अंबरनाथ पोलिसांनी या खुनी बापावर मुलाच्या हत्येचा गुन्हा दाखल करून त्याने हे भयंकर कृत्य करण्यामागे काही वेगळे कारण आहे का याचा तपास अंबरनाथ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोनावणे करीत आहेत. या घटनेने अंबरनाथमध्ये खळबळ माजलेली आहे.

दुसरी घटना नाशिक जिल्ह्याच्या अंबड मधील आहे. अंबड लिंक रोडवर शवव्हिला अपार्टमेंटमध्ये रामकिशोर अवधूतप्रसाद भारती हे आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांना ज्योती नावाची मुलगी होती. घरात तरुण मुलगी असली कि बापाच्या जीवाला घोर असतो. त्यामुळे मुलीचे लग्न करण्यासाठी त्याची धडपड सुरु असते. रामकिशोर हे सुद्धा मुलीच्या लग्नासाठी प्रयत्न करीत होते. पण लग्नाचा विषय काढला कि ज्योती चिढायची. कारण तिचे एका तरुणाशी प्रेम होते, पण तिच्या आई वडिलांना तिचे हे प्रेम प्रकरण मान्य नव्हते. दरम्यान दोन वेळा याच गोष्टीवरून ज्योतीच वाद झाला आणि ती घरातून निघून गेली, पण नंतर नातेवाईकांनी तिची समजूत काढून तिला घरी आणले. दरम्यान एके दिवशी तिचा मूड बघून वडिलांनी तिच्या लग्नाचा विषय काढला. पण लग्नाचा विषय काढताच ती नेहमीप्रमाणे चिडली आणि बापाला उलट सुलट बोलू लागली. त्यामुळे बापाचा संयम सुटला आणि त्याने रागाच्या भरात मुलीच्या गळ्यातील ओढणीने तिचा गळा आवळून तिची हत्या केली. या प्रकरणी आरोपी बापाला पोलिसांनी अटक केली आहे.

# दारूच्या नशेत अब्रू लुटायला गेला प्रतिकार करताच तिचा खून केला





आरोपी विशाल

जळगाव/क्राईम रिपोर्टर

दारूच्या नशेमुळे काही लोकांची कामवासना चालवते आणि त्यातून ते लंपट बनून येणाऱ्या जाणाऱ्या महिलांकडे आशाळभूतपणे पाहू लागतात. जळगाव नजीकच्या चिंचखेडा गावात विशाल साबळेलाही दारूच्या नशेत महिलांकडे वाईट नजरेने बघायची सवय होती. एकदा तो दारू पिऊन घरात एकट्या असलेल्या महिलेच्या घरात शिरला आणि तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करू लागला, पण तिने प्रतिकार करताच त्याने लोखंडी पाईप तिच्या डोक्यात घालून तिला ठार मारले आणि पळून गेला. त्यानंतर पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्याला अटक केली.

मद्यपान करणाऱ्या मद्यपींची देखील वर्गवारी असते. आपापल्या कुवतीनुसार हलक्या प्रतीपासून महागडे मद्य पिणारा वर्ग समाजात विखुरलेला आहे. सर्वच लोक मद्यपान करत नाही. हलक्या प्रतीचे मद्य पिणाऱ्यांना मद्य पिण्यासाठी कुठलीही जागा चालते. कोणत्याही आडोशाला असे लोक मद्यपान करुन आपली हौस भागवून घेतात. काही मद्यपी बारमधे जावून चार भिंतीच्या आड मद्यपान करतात. काही लोक खासगी अथवा आपल्या स्वत:च्या जागेत एकटे अथवा फार जवळच्या परिचितांसोबत बसून मद्यपान करतात. हलक्या प्रतीचे मद्यपान केल्यानंतर बरेच जण कित्येकदा बहकून जातात. मद्यपान केल्यानंतर अशा मद्यपींना आकाश ठेंगणे झालेले असते. काहींच्या अंगी हिंसाचार उसळून येतो. काही जण मनातले सत्य चारचौघात बरळतात. काही लोक एखाद्याकडून सत्य वदवून घेण्यासाठी अथवा आपला मतलब साध्य करण्यासाठी दुसऱ्याला मद्यपान घडवून आणतात. मद्यपानाचा निषेध करण्यासह सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालण्याची शिकवण देणाऱ्या महात्मा गांधीजींनी सत्याची कास धरली होती. मात्र सत्य वदवून घेण्यासाठी कित्येकदा मद्यपानाची मदत घ्यावी लागते हे देखील तेवढेच खरे आहे. नार्कोटेस्ट हा त्यातलाच एक प्रकार आहे. जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील चिंचखेडा या गावी एका मद्यपीने तर एका महिलेच्या घरात घुसून तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या महिलेने पुर्ण ताकदीने त्याला प्रतिकार केला. महिलेची प्रतिकारशक्ती आणि नंतर होणाऱ्या संभाव्य बदनामीला घाबरुन आणी चिडून त्या मद्यपीने लोखंडी अवजार तिच्या डोक्यात ...पान २ वर

# दारूच्या व्यसनापायी मुलगा दिवाना झाला बायको सोडून जाताच बापाचा खून केला



कोल्हापूर (आजरा)/क्राईम रिपोर्टर

दारूची नशा करी आयुष्याची दुर्दशा... असे म्हटले जाते ते काही खोटे नाही. कारण माणसाला एकदा का दारूचे व्यसन लागले कि माणसाला कशाची शुद्ध राहत नाही, त्याचे काम धंद्यावरुनही लक्ष उडते. कोल्हापूर जिल्ह्याच्या बहिरेवाडीमध्ये राहणाऱ्या सचिन गोरीले यालाही दारूचे व्यसन होते. त्यामुळे त्याला बायको सोडून गेली. त्यामुळे तो अधिकच चिडला होता. बायको सोडून गेल्यावर त्याने आई वडिलांना त्रास द्यायला सुरुवात केली आणि एके दिवशी दारूच्या नाशेत त्याने आई–वडिलांवर प्राणघातक हल्ला केला यात बापाचा मृत्यू झाला, तर आई गंभीर जखमी झाली. या प्रकरणी पोलिसांनी सचिनला अटक केली आहे.

कोल्हापूर जिल्हयातील आजरा तालुका तसा सधन तालुका म्हणून ओळखला जातो.आजऱ्याजवळील बहिरेवाडी येथे कृष्णा गोरूले हे आपल्या पत्नी मुलासह राहयला आहेत. घरची शेती असल्याने त्यांची आर्थिक परिस्थीती ही सधन होती. मुलगा सचिन याचे त्यांनी गेल्या पाच सहा वर्षापूर्वी लग्न केले होते. तो ही कागल एमआयडीसीत कामाला येत होता. त्याचा संसार ही बहरत फुलत असताना त्याला ही बघता बघता दोन मुले झाली. लग्नाला पाच सहा वर्ष झाली असल्याने संसारात कशाचीच उणीव नव्हती. परंतु अलिकडे सचिन हा मित्रांच्या संगतीने दारू पिऊ लागला होता. पहिल्यांदा महिन्यातून एकदा दारू पिणारा सचिन हा आता दररोज रात्री दारू पिऊ लागला होता.त्यामुळे नवरा बायकोची दररोज भांडणे होऊ लागली होती त्या भांडणात सचिन हा बायकोला मारहाण करीत शिवी गाळ करीत होता. ती त्याचा मार खाऊन संसाराचा गाडा कसा ...पान २ वर

# दारू पिऊन तो त्रास द्यायचा फार भावानेच केले सख्ख्या भावाला ठार



लातुर/अंबादास करकरे

दारुडा माणूस हा केवळ बाहेरच्या लोकांसाठीच त्रासदायक ठरतो असे नाही, तर कुटुंबातील लोकांनाही त्याचा त्रास सहन करावा लागतो. पण शेवटी रक्ताचे नाते असले तरी दारुड्याचा त्रास किती दिवस सहन करायचा. कारण माणसाच्या सहनशीलतेलाही मर्यादा असतात. अशावेळी माणसाची सहनशीलता संपली कि मग कुणी नात्यागोत्याचा विचार करीत नाही. लातूरच्या भातखेडा येथील अशाच एका घटनेत दारू पिऊन कुटुंबातील लोकांना त्रास देणाऱ्या एका दारुड्याची त्याच्या सख्ख्या भावानेच गोळ्या घालून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी भावाला अटक केली आहे.





लातूर तालुक्यातील ग्रामिण पोलीस स्टेशन हद्दीत असालेल्या मौजे भातखेडा येथील पोलीस पाटील महादेव मारोती भालेराव यांनी दि. ७ फेब्रवारी २०२३ रोजी सकाळी लातूर ग्रामीण पोलिस ठाण्यास संर्पक करून मौजे भातखेडा येथील इसम नामे सुरज गोविंद मुळे (वय २५ वर्षे) हा मयत झाला आहे. व त्याचे डोक्यास मार आहे असे कळविले. मिळालेल्या माहीतीवरून लातूर ग्रामीण पोलिस ठाण्याच्या सपोनि श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी तात्काळ घटनेचे गांर्भीय ओळखून ठाण्यातील पोलिस कर्मचारी पोहे चंद्रपटले, ...पान २ वर

# लग्नाचा तगादा लावताच तो चिडला वॉचमनने प्रेयसीचा मुडदाच पाडला

नवी मुंबई/एस.कुमार

जे लोक शरीरसुखासाठी एखाद्या महिलेशी संबंध जुळवतात ते तिच्याशी कधीच लग्न करीत नाहीत. मात्र तरीही काही विवाहित महिला दुसऱ्याच्या प्रेमात पडतात. नवी मुंबईतील जुई नगरमध्ये घरकाम करणारी आणि २ मुलांची आई असलेली सईदा ती काम करीत असलेल्या इमारतीत वॉचमन असलेल्या राजकुमारच्या प्रेमात पडली. त्यानंतर दोघांचे अनैतिक संबंध सुरु झाले. मात्र तिने राजकुमारच्या मागे लग्नासाठी तगडा लावला होता. पण त्याला लग्न करायचे नव्हते. त्यामुळे तो सायदावर चिडला होता आणि एके दिवशी सायदाच्या मागे लागलेली कटकट कायमची संपवण्यासाठी त्याने तिचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



दिनांक १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजताच्या दरम्यान कोपरखैरणे गावचे पोलीस पाटील, सदानंद पाटील यांनी कोपरखैरणे पोलिसांना फोन करून सांगितले की, नवी मुंबईतील कोपरखैरणे येथील कांचनगंगा सोसायटीच्या विरुद्ध बाजुस असलेल्या नाल्यालगत, खाडीकडे जाणाऱ्या अरुंद रोडच्या डाव्याबाजुच्या झाडाझुडपामध्ये एका तळ्यापासुन १०० मीटर अंतरावर ३५ ते ४० वर्ष वयाच्या अज्ञात महिलेचा मृतदेह पडलेला आहे. तुम्ही ताबडतोब घटनास्थळी या. घटनेची माहिती मिळताच दिवसपाळीला ठाणे अंमलदार असलेले सपोनि. योगेश गायकवाड यांनी वरिष्ठांना या घटनेची माहिती देऊन ते पथकासह तातडीने घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी ...पान ६ वर

# २५ हजारांसाठी नोकर विश्वासघातकी ठरला साथीदारांच्या मदतीने डॉक्टरचा गळा चिरला

गोवा/क्राईम रिपोर्टर



मयत डॉ.निर्वाण

परप्रांतातील माणसाला कामावर ठेवायचे असल्यास त्याची संपूर्ण माहिती घेऊनच त्याला कामावर ठेवायचे असते. पोलिसांचे तसे कायदेशीर आदेशच आहेत. पण काही लोक या आदेशाकडे दुर्लक्ष करून अनोळखी व्यक्तीला कामावर ठेवतात आणि हे अनोळखी नोकर कधीही विश्वासघात करून पळून जातात. गोव्याच्या बेलाभट्टी येथे राहणारे आयुर्वेदिक डॉक्टर निर्वाण भारत यांनी सिमांचल परिंदा नावाच्या इसमाला स्वयंपाकी म्हणून कामावर ठेवले होते. त्याने एकदा काही दिवसाने त्या नोकराने डॉक्टरांकडे २५ हजार रुपये मागितले, पण त्यांनी इतके पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या सिमांचलने दोन साथीदारांच्या मदतीने डॉक्टरांची हत्या केली. मात्र पोलिसांनी या तिन्ही आरोपींना अटक केली आहे.



हल्ली काम न करता पैसे कसे मिळतील याकडे काही जणांचे लक्ष लागून राहिलेले असते. शॉर्टकटने पैसे मिळविण्यासाठी ते येण केण मार्गाचा अवलंब करीत असतात. गोव्यात बाहेर राज्यातून अनेकजण पोटा पाण्यासाठी येत असतात. सासष्टी जवळील नुवे येथे डॉ.निर्वाण भारत हे एका दवाखान्यात आयुवेर्दीक डॉक्टर म्हणून गेल्या पाच वर्षापासून काम करीत होते. ते राहयला बेतालभाटी येथील क्विनी रेसिडन्सी मध्ये प्लॅट घेऊन राहत होते. ते एकटेच असल्याने त्यांनी घरात आपल्या मदतीला स्वयंपाकी म्हणून सीमाचंल परिंदा याला ठेवले होते. तो ही मुळचा ओरिसा राज्यातील होता. कधी कधी तो डॉक्टरांच्या बरोबर ...पान ६ वर

20 TO 26 FEBRUARY 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2023 10:15 PM Page 1



पान १ वरून....

## पोलीस खात्यातील पत्नीने अचूक...

पतीची सुपारी देऊन त्याची हत्या घडवून आणली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे. विवाहबाहय संबंधात कोण कोणाला डोईजड होत असेल तर त्याचा पध्दतशीर काटा काढला जातो. नेमकी हिच बाब अमित भोसले याच्या खून प्रकरणातून स्पष्ट झाली. अमित याचे एका महिलेबरोबर अनैतिक संबध होते. तो तिच्याबरोबर गुलछर्रे उडवित मौजमजा करीत फिरत होता. त्याची पत्नी रागिणी ही पोलीस खात्यात नोकरीला असली तरी तो तिला काडीची ही किंमत देत नव्हता. कारण त्या दोघांचे कधीच एकमेकांशी पटत नव्हते. रागिणी ही पोलीस खात्यात नोकरीला असल्याने काही वेळा तिला नाईट डयुटी असायची त्यामुळे तिला घरी यायला वेळ लागायचा त्यामुळे सुरूवातीला तो तिच्यावर संशय घेऊ लागला होता. पोलीस खात्यातीलच एकाबरोबर तिचे ते संबंध आहेत याची त्याला माहिती मिळाली होती.पण ती माहिती फक्त ऐकीव होती. त्याने प्रत्यक्ष कधी त्या संबंधातून तिला रंगेहात पकडलेले नव्हते. या ऐकीव माहितीच्या आधारे तो तिला मारहाण करीत त्रास देवू लागला होता. त्यातच तिची बदली ही होत असल्याने ती एका पोलीस ठाण्यातून दुसऱ्या पोलीस ठाण्यात जात येत होती. पोलीस खात्यातील काही महिलांचे त्याचेचे सहकारी असणाऱ्या पुरूषासोबत ते संबंध असतात हे त्याला कुणी तरी सांगितले होते. त्यामुळे तो रागिणीकडे याच संशयी नजरेने पाहत होता. त्याला दारू पिण्याचे आणि मित्रासोबत पार्टया करण्याचा नाद असल्याने तो सारखा दारू आणि पार्टीसाठी बाहेर जात होता. त्यातूनच त्याचे एका महिलेबरोबर संबंध जुळून आले. त्याचा वाहन खरेदी विक्रीचा व्यवसाय असल्याने त्याच्याकडे पैसा अडका ही मोठया प्रमाणात येत जात होता. त्या महिलेबरोबर तो अलिकडे दोन तीन वर्ष संबंध ठेवून असल्याने अर्थातच त्याचे घराकडे बायको मुलाच्याकडे दुर्लक्ष झाले होते. व्यवसायातून मिळणारा पैसा तो त्या महिलेसाठी खर्च करीत होता.त्याचा हा बाहेरख्यालीपणा रागिणीच्या लक्षात आला होता.तो बाहेरख्यालीपणाने वागतो पण संशय मात्र माझ्यावर घेतो आणि मला शारीरिक व मानसिक त्रास देतो याचा तिला राग आला होता. अलिकडे ती ही त्याचेबरोबर राहत नव्हती. ती वेगळीकडेच रुम करून राहत होती. त्यामुळे तिचा आणि त्याचा सहसा संबंध येत नव्हता. तरी ही ते दोघे अजूनही नात्याने नवरा बायको असल्याने त्या दोघात विस्तव ही जात नव्हता. तो तिला घटस्फोट दे मी दुसरे लग्न करणार आहे असे म्हणून तिच्या मागे लागला होता. कितीही त्रास झाला तरी काही महिला या लग्नाच्या नवऱ्याला कधीच सोडीत नसतात तसेच रागिणीचे ही झाले होते. तिला तो त्रास देत अत्याचार करीत होता पण त्याचा त्रास ती सहन करीत होती कधी तरी तो सुधारेल असे तिला वाटत होते. पण तिची ती अपेक्षा फोल ठरत होती.कारण तो त्या महिलेच्या संबंधात इतका गुरफटला गेला होता की त्याला रागिणी ही नकोच होती. त्याची ती गरज तो बाहेर पुर्ण करीत होता. अलिकडे तिला होणारा त्रास हा तिच्या सहनशक्तीच्या पलिकडे गेला होता. त्यामुळे ती ही त्याच्या त्रासाला वैतागलेली होती.त्याच्या त्रासाने तिची मानसिक स्थिती ही बिघडत चालली होती.तिला त्याचे काही तरी बरे वाईट करावे असे वाटत होते.कारण असला नवरा असून तरी काय उपयोगाचा असे तिला वाटत होते. आपल्याला त्रास करतो आणि आपण मात्र दुसऱ्या महिलेच्या नादाला लागून मजा मारतो आपले काही मन आहे का नाही असे तिला वाटत होते. त्याच्या त्रासला कंटाळून ती मनाने खचली होती. तरीही तिने यातून काही तरी मार्ग काढयाचाच असा विचार केला. अलिकडे तर तो तिला मला घटस्फोट दे नाही तरी तुला संपवितो अशी धमकीच त्याने दिली होती.त्याच्या धमकीला ती घाबरणारी नव्हती. उलट त्यालाच कायमचा धडा शिकवयाचा म्हणजे त्याला अद्दल घडेलकारण रोज रोज त्रास करून घेण्यापेक्षा एकदा यातून मार्ग काढलेला केव्हा ही बरे असा तिने विचार केला. ती पोलीस खात्यात नोकरीला असल्याने सराईत गुन्हेगाराची तिला माहिती होती.कोण सुपारी घेऊन गेम करतो हे तिला चांगले माहित होते. यातूनच तिने कोरेगाव तालुक्यातील नांदगिरी येथील अभिषेक विलास चतुर याची ओळख काढली. तो सुपारी घेऊन गेम करतो याची तिला माहिती मिळाल्यावर तिने त्याची भेट घेऊन त्याला आपला नवरा अमित भोसले याचा गेम करायची आहे तु मदत कर असे सांगून त्याला या कामी काही रक्कम देऊन अमितच्या हत्येची सुपारी दिली. तिने अमितच्या हत्येची सुपारी अभिषेक चतुर बरोबर झालेल्या दोन तीन भेटीत डिल केली आणि त्याचेबरोबर प्लॅन केला. अभिषेक हा सराईत गुन्हेगार असल्याने त्याला कोणाची कशी गेम करायची हे चांगले माहित होते. त्याने या कामी आपले इतर चार साथीदारांची मदत घेण्याचे ठरविले. रागिणी ही पोलीस खात्यात नोकरीला असल्याने या गुन्हयातून आपण कसे बाहेर पडू शकतो याचा ही प्लॅन त्याने रागिणी बरोबर केला. रागिणीने या कामी अमितची संपुर्ण माहिती त्याला पुरवली होती. अमित हा आपल्या मैत्रीणीला घेऊन हायवे वरील वाढे फाट्यावरील हॉटेलात जेवायला जाणार असल्याची माहिती रागिणीला मिळाली. तिने ही माहिती अभिषेक याला दिली. त्यानुसार अभिषेक याने त्याच्या हत्येची तयारी केली. २४ जानेवारी २०२३ रोजी अमित हा आपल्या त्या मैत्रीणीसोबत वाढे फाटयावरील हॉटेलात जेवायला गेला. त्यावेळी त्याच्या मागावर असलेले अभिषेक चतुर आणि त्याचे मित्र तेथे आले. तो जेवण करून बाहेर आला आणि आपल्या कारमध्ये बसत होता. त्याची ती मैत्रीण अगोदरच कारमध्ये बसली होती. तो कारमध्ये बसत असताना अचानक दुसऱ्या कारमधून अभिषेक आणि त्याचे मित्र तेथे आले. अमित कारमध्ये बसत असताना त्यांनी त्याचेवर आपल्या पिस्तुलातून पाच सहा गोळ्यां घातल्या तरी देखील अमित हा डगमगला नाही तो कसा बसे स्वतःला सावरत कारमध्ये बसत परिस्थीती ओळखून तेथून पळून जाण्याच्या विचारात असताना अभिषेक व त्याचे मित्रांनी त्याला कारमधून खेचत बाहेर काढले आणि त्याचेवर आपल्याकडील धारदार शस्त्राने त्याच्या मानेवर, पोटात आणि पाटीत वार केले. त्यासरशी अमित हा रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्याची मैत्रीणी ही थरकापत ओरडत होती.ती घाबरलेली होती गोळी झाडल्याच्या आवाजाने हॉटेलमधील लोक बाहेर आले. त्यांनी समोरचा थरकाप उडविणारा प्रसंग बघून ते ही घाबरले.लोक आपल्यांकडे येत असल्याचे बघून अभिषेक व त्याच्या साथीदारांनी आपल्या कारमधून पलायन केले. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या घटनेने सगळेजण धास्तावले होते. हॉटेल मालकाने या घटनेची माहिती सातारा शहर पोलीस स्टेशनला दिली. या घटनेची माहिती मिळताच सातारा शहर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी घटनेची पाहणी करून पंचनामा सुरू केला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत अमित भोसले याची मैत्रीणी कडून घेतली. तिला ही या घटनेविषयी काही सांगता येत नव्हते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदना साठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी पोलीसांनी तपासासाठी श्वान पथकाला आणि ठसे तज्ञांना पाचारण केले. या घटनेने सुंपर्ण सातारा जिल्हा हादरला होता. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी आजुबाजुच्या सीसीटिवीव्हीच्या फुटेजची पाहणी केली.त्या फुटेजमध्ये संशयीत आरोपी स्पष्ट दिसत होते.पोलीसांनी संशयीत आरोपीच ओळख पटविल्यावर पोलीसांनी त्याचा शोध सुरू केला.त्याच्या मोबाईल कॉलच्या लोकेशनवरून त्याचा शोध सुरू केला असता ते संशयीत आरोपी नेहमी आपला ठिकाणा बदलत होते.त्याच्या मोबाईल कॉलचे लोकेशन सातारा, पुणे औरंगाबाद, जळगाव, अहमदनगर, लातूर आलिबाग, इंदोर, उज्जैन असे दाखवित होते.या घटनेनंतर हे संशयीत आरोपी गोवा राज्यात आले असल्याची माहिती पो.निरी अरूण देवकर यांना मिळाली. त्यांनी भुईज पोलीस स्टेशनचे पो.निरी.रमेश गर्जे याचे एक पथक तयार करून गोवा राज्यात आरोपीचा शोध घेण्यासाठी पाठविले. पण या पथकाला तेथे पोहचण्यास वेळ लागणार व तेथून संशयीत आरोपी फरार होण्याची शक्यात ग्रहीत धरून पो.निरी. देवकर यांनी गोवा पोलीसांशी संपर्क साधून संशयीत आरोपीची माहिती देवून त्यांना जेरबंद करण्याची सुचना केली.त्यानुसार दक्षिण गोवा पोलीसांनी या सहा संशयीत आरोपीना ताब्यात घेऊन सातारा पोलीसाच्या ताब्यात दिले. या घटनेनंतर अवघ्या १० दिवसांनी संशयीत आरोपी जेरबंद झाले होते. सातारा पोलीसांनी त्याचेकडे अमित भोसले याच्या खून प्रकरणी या आरोपीच्याकडे चौकशी केली असता त्यांनी अमित भोसले याची पोलीस पत्नी रागिणी भोसले हिने अमित भोसले याच्या खूनाची सुपारी दिल्याचे सांगून त्याच्या सांगण्यानुसार आपण अमित भोसले याची गेम केल्याचे सांगितले. या घटनेत मयत अमित भोसले याची पत्नी रागिणी भोसले हिचा सहभाग असल्याचे समजाताच सातारा पोलीसांनी तिला देखील ताब्यात घेतले. मयत अमित भोसले याचे विवाहबाहय संबंध असून देखील तो तिला शारिरीक मानसिक त्रास देत असल्याने आपण त्याच्या खूनाची सुपारी दिल्याचे तिने दिलेल्या कबुली जबाबात सांगितले. संशयीत आरोपीनी गुन्हयाची कबुली दिल्याने मयत अमित भोसले याच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अमित आप्पासाहेब भोसले (वय ४०) याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी रागिणी भोसले (वय ३२), अभिषेक विलास चतुर (वय २७), शुभम हिंदुराव चतुर (वय २६), राजू भिमराव पवार (वय २६), सचिन रमेश चव्हाण (वय २२), सुरज ज्ञानेश्वर कदम (वय २७) व एक अल्पवयीन आरोपी याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, ३४ वशस्त्र अस्त्र परवाना कायदया नुसार त्याचे विरोधात गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासममोरे हजर केले असता मा.कोर्टाने त्यांना १० फेब्रुवारी पर्यत पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेले शस्त्र, पिस्तुल व कार जप्त केले. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पो.अधिक्षक बापु बांगर, डीवायएसपी मोहन शिंदे याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी. अरूण देवकर,विश्वजीत घोडके, स.पो.नि.रमेश गर्जे, संतोष पवार, रविंद्र भोरे, पो.उप.निरी.अमित पाटील व त्याचे सहकाऱ्यांनी केला. विवाहबाहय संबंध टोकाला गेले की, त्यातून खूनासारखी घटना ही घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारूच्या नशेत अब्रू लुटायला गेला...

मारुन तिला जीवानिशी ठार केले. या घटनेमुळे जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुका जणूकाही हादरला. मद्यपान एखाद्याच्या जिवावर उठू शकते हे या घटनेतून दिसून आले आहे. जामनेर शहरापासून अवघ्या आठ कि.मी. अंतरावर जळगाव रस्त्यावर चिंचखेडा हे गाव आहे. या गावात विशाल ज्ञानेश्वर साबळे हा अवघा २३ वर्ष वयाचा तरुण राहतो. तेवीस वर्षाचा विशाल हा मद्यपी म्हणून गाव परिसरात कुप्रसिद्ध होता. तो नेहमी कट्ट्यावर बसून येणाऱ्या जाणाऱ्या महिलांकडे बघण्याचा उद्योग करत होता असे म्हटले जाते. या गावात एक महिला रहात होती. तो बसत असलेल्या कट्ट्यावरून ती नेहमी ये जा करत असे. त्यामुळे तो तिला नावानिशी ओळखत होता. त्या महिलेचा पती चहाची टपरी चालवत असे. त्यामुळे तो लवकरच घरातून बाहेर पडत असे. त्या महिलेचा मुलगा शाळेत केव्हा जातो आणि केव्हा परत येतो हे देखील त्याला ठाऊक होते. तो तिच्याकडे अधाशाप्रमाणे बघत असे. त्यामुळे त्या महिलेच्या मनात लज्जा निर्माण होत असे. मात्र त्याला त्याचे काही सोयरसुतक नव्हते. त्याचे निरखून बघणे तिला आवडत नव्हते. मात्र ती महिला संसारप्रिय असल्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करत असे. दि. ६ फेब्रुवारी रोजी नेहमीप्रमाणे विशाल साबळे याने मद्यपान केले होते. तो नेहमीप्रमाणे त्या दिवशी कट्ट्यावर बसलेला होता. या दिवशी त्या महिलेचा मुलगा शाळेत गेलेला होता. तिची सासू देखील बाहेरगावी गेली होती हे त्याला समजले. ती महिला घरात एकटीच असल्याचे त्याला समजले. ती महिला घरात एकटीच असल्याचे समजल्यानंतर मद्याच्या अधीन झालेल्या विशाल साबळे याच्या अंगी असलेला सैतान जागा झाला. त्याच्यातील कामवासना जागी झाली. आजुबाजूला कुणी नसल्याचे बघून त्याने त्या महिलेच्या घरात प्रवेश केला. घरात गेल्याबरोबर त्याने त्या महिलेसोबत झोंबाझोंबी करण्यास सुरुवात केली. घरात अनाधिकारे आलेल्या विशालचा हेतू त्या संसारप्रिय महिलेच्या लक्षात आला होता. तीने तेवढ्याच ताकदीने त्याला प्रतिकार करत त्याच्या मनातील हेतू परतवून लावण्यासाठी निकराने लढा दिला. तीने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. आता गावात आपली बदनामी होणार हे त्याच्या लक्षात आले होते. त्यामुळे त्याने जवळच पडलेले लोखंडी अवजार तिच्या डोक्यात मारले. या हल्ल्यात लोखंडी अवजार तिच्या डोक्यात बसल्याने तिची कवटी फुटून ती महिला रक्ताच्या थारोळ्यात जमीनीवर कोसळली. आपल्या हातून खूनाची घटना घडल्याचे लक्षात आल्यानंतर विशाल साबळे भानावर आला. त्याने लागलीच दरवाजाला बाहेरुन कडी लावून घटनास्थळावरुन पलायन केले. या दिवशी गावात लग्न असल्यामुळे गावातील बहुतेक सर्वजण गावपंगतीत गेले होते. सायंकाळचे सहा वाजून गेले होते. गावात अंधार पडण्यास सुरुवात झाली होती. मृत महिलेचा चुलत सासरा सायंकाळी बकऱ्या चारून घरी परतला. तिच्या घराच्या दरवाज्याला कडी लावलेली बघून सुनबाई कुठेतरी बाहेर गेली असावी असा त्यांचा समज झाला. चुलत सासऱ्याने दरवाज्याला बाहेरुन लावलेली कडी उघडून घरात प्रवेश केला. घरात प्रवेश करताच त्यांची सुन किचनमध्ये रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत पडून असल्याचे भयावह दृश्य त्यांच्या नजरेस पडले. त्यांनी एकच हंबरडा फोडत गावकऱ्यांना जमा केले. बघता बघता या घटनेची वार्ता गावात वाऱ्यासारखी पसरण्यास वेळ लागला नाही. घटनास्थळी गावकऱ्यांनी एकच गर्दी केली. या घटनेची माहिती समजताच जामनेर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत फॉरेन्सिक लॅब पथक, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, फिंगरप्रिंट्स पथक, डॉग स्कॉड आदी घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अधीक्षक एम. कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीसगाव परिमंडळाचे अतिरिक्त पोलिस अधिक्षक रमेश चोपडे, पाचोरा उप विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक अभयसिंह देशमुख, एलसीबीचे पोलीस निरीक्षक किसनराव नजनपाटील, जामनेर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक दिलीप राठोड, पोलीस उपनिरीक्षक मोहिते, हे.कॉ. रमेश कुमावत, निलेश घुगे, सुनील राठोड, सचिन पाटील, संदीप पाटील, तुषार पाटील आदींनी देखील घटनास्थळी दाखल होत वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासकामाला सुरुवात केली. या घटनेप्रकरणी मयत महिलेच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीनुसार जामनेर पोलिस स्टेशनला सुरुवातीला अज्ञात आरोपीविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. ४१/२३ भा.द.वि. ३०२ नुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला. हा खूनाचा गुन्हा गावातील मद्यपी विशाल ज्ञानेश्वर साबळे यानेच केला असल्याची गोपनीय माहिती जामनेर पोलिस स्टेशनचे पो.नि. किरण शिंदे यांना समजली. घटना घडल्यापासून तसेच उघडकीस आल्यापासून तो गावातून फरार झाला असल्याचे देखील आढळून आले. पो.नि. किरण शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेशांतर करुन गोपनीय पद्धतीने अवघ्या तिन तासातच विशाल साबळे यास पकडून आपल्या ताब्यात घेतले. त्याने आपला गुन्हा कबुल केला. या गुन्ह्याचा पुढील तपास पो.नि. किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक दिलीप राठोड व त्यांचे सहकारी करत आहेत.

## दारूच्या व्यसनापायी मुलगा दिवाना...

तरी ओढीत होती. तिला आपल्या मुलांच्या भविष्याची चिंता होती. तिचे आई वडिल ही गरिब होते. म्हणून ती आपल्या आई वडिलांच्या इज्जतीसाठी नवऱ्याचा मार खाऊन गप्प राहत होती. हल्ली सचिन हा कामावर ही जात नव्हता. त्याचे घराकडे संसाराकडे बायको मुलाच्याकडे अजिबात लक्ष नव्हते. कशाच्या तरी टेन्शनमध्ये असल्यासारखे तो दिसत होतो. त्याला फक्त दारू आणि दारूच माहित होते. दारू पिऊन आले की बायकोला कारर नसताना बडवायचे. तिला शिवी गाळ करायचे तिला मानसिक त्रास दयायचा एवढेच त्याला माहित होते. नवरा आपल्याला मारहाण करीत शिवीगाळ करीत आहे याची माहिती सचिनच्या बायकोने आपल्या माहेरी आई वडिलांना दिली होती. त्यामुळे भांडणात ती एकदा दोनदा माहेरी ही निघून गेली होती. त्यावेळी तिच्या आई वडिलांनी सचिनची समजुत काढून आपल्या मुलीला मारहाण करू नका तिला त्रास देऊ नका असे सांगितले होते. त्यानंतर त्याचा संसार काही दिवसच मार्गस्थ लागला होता. सचिनच्या दारू पिण्याच्या सवयीला त्याचे आई वडिल ही कंटाळलेले होते. त्यांनी त्याला समज दिली होती. दारू पिण्याचे सोड चांगला वाग संसार नीट कर बायका मुलांना सांभाळ असे सांगत होते पण तो त्याच्या सांगण्याकडे ही दुर्लक्ष करीत होता. आई वडिल ही आपल्या बायकोचेच ऐकतात असा त्याचा समज झाला होता. त्यामुळे तो बायकोवर चिडून होता. हिच्यामुळे आपले आई वडिल आपल्याला टोचून बोलतात कामधंदा कर म्हणून सांगतात असा त्याने अर्थ काढला होता. यातूनच त्या दोघा नवरा बायकाचे कधीच पटत नव्हते. त्याची दररोजची भांडणे ही ठरलेलीच होती. त्या भांडणातून त्याची बायको आपल्या मुलांना घेऊन परत एकदा आपल्या माहेरी गेली ती पुन्हा बहिरेवाडीला परत आली नाही. तिच्या आई वडिलांनी ही तिला नांदायला पाठविले नाही.त्यातूनच त्याच्या बायकोने कोर्टामार्फत त्याच्याकडून घटस्फोटा घेतला. घटस्फोटानंतर ती आपल्या माहेरी राहू लागली.तर इकडे अगोदरच दारूच्या व्यसनाच्या आहरी गेलेला सचिन परत एकदा रात्र आणि दिवस दारू पिऊन घरातच राहु लागला.त्याला कामधंदयाची ना घराची चाड राहिली. बायकोने घटस्फोट घेतल्यानंतर तो जास्तच वैफल्याग्रस्त झाला होता. त्याची मानसिक स्थिती कोलमडून पडली होती. त्याचा संसार विस्कटायला तोच जबाबदार होता परंतु त्याचे खापर मात्र तो आपल्या आई वडिलावर फोडत होता. हल्ली तो काही ना काही कारण काढून आई वडिलाच्याबरोबर भांडण काढून त्यांना मारहाण करीत होता. त्याच्या घरच्या भांडणाने त्याचे शेजारी ही वैतागलेले होते. किती वेळा त्यांनी त्याची भांडणे सोडवली होती. सकाळी वडिल शेतात कामाला गेले की तो दारू पिण्यासाठी आईकडे पैसे मागत होता. त्याची आई त्याला पैसे देत नव्हती. त्यामुळे तो आईलाच घाण घाण शिव्या देत होता. रात्री वडिल घरी आले की त्याची आई सचिनने दिलेला त्रास त्यांना सांगत होती. त्यामुळे रात्री ही त्याची आई वडिलासोबत भांडणे होत होती. त्याच्या संसार त्याच्या वागण्याने व्यसनाने मोडला होता. त्याला त्याचे आई वडिल जबाबदार नव्हते. त्यामुळे त्याचे वडिल ही त्याचेवर चिडत त्याला घाण घाण शिव्या देत टोचून बोलत होते. तुला कामधंदा करायला नको नसुता मुतू प्यायला पाहिजे तुझ्या वागण्यामुळेच तुला बायको सोडून गेली. आता तरी नीट वाग चांगला राह असे म्हणत होते. पण त्याला आई वडिलांचे टोजून बोलणे खपत नव्हते. उलट तो त्यांनाच आपला संसारा मोडायला कारणीभूत ठरवित होता. दिवसागणीक त्यांची भांडणे होत होती. मुलगा हातचा गेला आहे हे त्याच्या वडिलांनी ओळखले होते. काही तरी करून त्याला मार्गस्थ लावायचा त्याचा प्रयत्न होता पण तो दारूच्या इतक्या आहरी गेला होता की त्याला दारू शिवाय काहीच सुचत नव्हते. घरी असला की तो आई बाबाबरोबर भांडण काढीत त्यांना मारहाण करीत होता. शुक्रवार १० फेब्रुवारीला गावात लक्ष्मीदेवीची यात्रा सुरू होती. गावात प्रत्येकाच्या घरी पै पाहुण्याची रेलचेल होती.गावदेवीची यात्रा म्हणून लेकी सुना आल्या होत्या.गावात यात्रेच्या ठिकाणी सकाळ पासून रात्री पर्यत गर्दी होती. मात्र रात्रीच्या सुमारास घरात झोपलेल्या सचिन याने आई बरोबर कोणत्या तरी कारणातून भांडण काढले. ती त्याला शिव्या देत असताना दारूच्या नशेत असणाऱ्या सचिन याने रागाने घरातील खुरपे घेतले आईच्या डोक्यात खुरप्याने जबर वार केला. त्यासरशी आईच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. ती बिचारी ओरडत खाली पडली. तेवढयात काय झाले म्हणून वडिल कृष्णा गोरूले हे आतील खोलीतून बाहेरच्या खोलीत आले. काय केलेस रे उंडगीच्या म्हणून ते त्याला काठीने मारायला जात असताना सचिनने आपल्या हातातील धारदार खुरप्याने त्याच्या मानेवर, पोटावर, गळ्यावर खुरप्याने सपासप वार केले. ते ही ओरडतच खाली पडले. त्याने केलेल्या हल्ल्यात कृष्णा गोरूले याचा जागीच मृत्यू झाला होता. ते रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडले. त्या दोघाच्या आवाजाने शेजार पाजारी त्यांच्या घरात आले. सचिनने खुरप्याने आई वडिलावर हल्ला केल्याचे बघून ते ही घाबरले. दोघावर हल्ला करून सचिन हा समोर येणाऱ्याला प्रत्येकाला घाबरवत होता. मला आडवाल तर तुमचा ही मी खून करेन असे बडबडत होता. त्यातच गल्लीतील काही तरूण मुलांनी सचिन हा पळून जावू नये म्हणून सगळ्या लोकांना घराबाहेर काढले.आणि घराचा दरवाजा मागून आणि पुढच्या बाजून बाहेरून बंद केला. घरचा दरवाजा बंद केल्याने सचिन हा काहीच झाले नसल्याच्या अविर्भावात घरातील माळयावर जाऊन झोपला. इकडे एकाने या घटनेची माहिती आजरा पोलीसांना दिली. बहिरेवाडी गावात खूनाची घटना घडल्याचे समजाताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तर त्याच वेळी गंभीर जखमी असलेल्या सचिनच्या आईला काही जणांनी गावातील आजरा येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेले. तेथील प्राथमिक उपचारानंतर त्यांना कोल्हापूर येथील सरकारी दावखान्यात नेण्यात आले. त्याची प्रकृत्ती ही चित्ताजनक होती. इकडे पोलीस निरी.सुनिल हारुगडे यांनी घटनास्थळावर पोहचून या घटनेची माहिती त्यांनी शेजाऱ्याकडून घेतली. घरातील माळयावर संशयीत आरोपी सचिन गोरूले हा लपून बसला असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. घटनेचा पंचनामा करून मयत कृष्णा गोरूले याचा मृतदेह त्यांनी शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.सचिन गोरूले याला पोलीसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची माहिती घेतली असता त्याने पोलीसांना आपला गुन्हा कबुल करून आपले आई वडिल आपल्याला सतत टोचून बोलत असल्याने आपण त्यांना मारहाण केल्याचे सांगितले. या मारहाणीत वडिलांचा मृत्यू झाल्याचे बघून त्याला कोणताही पश्ताप झाला नाही. दुसऱ्या दिवशी या घटनेची फिर्याद मयत कृष्णा गोरूले याच्या नातेवाईकांनी आजरा पोलीसात दिल्यावर पोलीसांनी कृष्णा बाबु गोरूले (वय ६५) याच्या खून प्रकरणी त्याचा मुलगा सचिन कृष्णा गोरूले (वय ३२) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ सह ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेले खुरपे जप्त केले. या घटनेचा पुढील तपास पो.निरी सुनिल हारूगडे याच्या मार्गदर्शनाखाली आजरा पोलीस स्टेशनेचे पोलीस करीत आहेत. संसाराची घडी एकदा विस्कटली की ती लगेच सावरावी लागते. त्यातच घरातील कर्ता पुरूष जर दारूच्या व्यसनाच्या आहारी गेला की ती घडी सावरत नाही.

## दारू पिऊन तो त्रास द्यायचा ...

पोकॉ अक्षय डिगोळे, गजानन टारपे, राहूल रेड्डी ,नितीन पाटील यांना सोबत घेत तात्काळ घटनास्थळ गाठले. भातखेडा गावी जाउन घटनेची खात्री केली असता मयत सुरज मुळे याचे डोक्यात जखमा दिसून आल्या. यावरून मयत सुरज मुळे याचा घातपात झाला आसवा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला. पोलिसांनी घटनेची प्राथमिक माहीती घेत पंचनाम्याला सुरूवात केली. घटनास्थळावरील आवश्यक ती माहीती घेत प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात पाठविण्याची तजबीज केली. मयताचे वडील गोविंद रामकृष्ण मुळे यांनी दिलेल्या खबरी वरून पोलीस स्टेशन लातूर ग्रामिण येथे आमृ न ०७/२०२३ सीआरपीसी १७४ प्रामणे दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा प्राथमिक तपास सपोनि श्रीमती ठाकूर यांचाकडे देण्यात आला. या प्रकरणाच्या दरम्यान शवविच्छेदना दरम्यान मयत सुरज मुळे यास कोणत्यातरी अग्निशस्त्राचा वापर करून त्याचे डोक्यात गोळी मारल्याने तो मरण पावला असा शवविच्छेदन करणारे वैदयकिय अधिकारी सरकारी दवाखाना लातूर यांनी अहवाल दिल्याने प्राथमिक तपास अधिकारी सपोनी श्रीमती ठाकूर यांनी मयत सुरज मुळे याचे डोक्यात कपाळाचे वर उजवे बाजूस कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी डोक्यात अग्निशस्त्राने गोळी मारून मयत सुरज याचा खुन केला आहे अशी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने पो स्टे लातूर ग्रामिण येथे गु.र.न. ४६/२०२३ कलम ३०२ भादवी. सह कलम ३,५ आर्म अँक्ट व सह कलम १३५ म.पो.का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलिस अधिक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ.अजय देवरे, लातूर ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी सुनिल गोसावी, यांचे मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सुत्र लातूर ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दिपककुमार वाघमारे यांच्या हाती देण्यात आले. तसेच स्थानिक गुन्हे अन्वेशन विभागालाही समांतर तपासाचे आदेश देण्यात आले. काही दिवसापुर्वीच लातूर ग्रामीण पोलिस ठाण्याचा पदभार घेतलेले पोलिस निरीक्षक दिपककुमार वाघमारे यांनी तपासाचे सुत्र गतीमान करत या प्रेकरणाची प्राथमक माहीती घेण्यास सुरूवात केली. सर्व प्रथम पोलिसांनी भातखेडा गाव गाठून मयत सुरज मुळे यांच्या नातेवाईकांकडे चौकयी केली असता मयत सुरज मुळे हा दारूच्या अहारी गेल्याने सतत नशेत राहत होता. त्याचे वडील आजरी होते. तर त्याचा लहान भाऊ आपल्या अपंग बहिणीला व आईला घेवून पुणे येथे वास्त्व्यास होता. तसेच तो पुणे येथे सुरक्षा रक्षकाची नोकरी करत आसल्याची माहीती समोर आली आणी पोलिसांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. मयत सुरज मुळे याच्या हत्येमागे घरातीलच कोणाचा तरी सहभाग असावा असा संशय पोलिसांना आला.दरम्यान सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना व गुन्हातील अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी वरील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शणाखाली विवीध पोलीस शोध पथके तयार करून तपास कामी रवाना केले. गुप्तबातमीदार नेमुण त्यांना सुचना देवुन गुप्तमाहीती काढण्यास सुरूवात केली. दरम्यानं गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली कि, गुन्हातील मयत सुरज गोविंद मुळे व त्याचा भाऊ धिरज गोविंद मुळे यांचेत सतत घरगूती कारणावरून वाद व भांडणे होत होती. मयत सुरज यास धिरज याने जिवे मारण्याची धमकी दिलेली होती. मयत सुरज नेहमी दारू पिउन आई वडीलांना व अपंग बहीणीला व धिरज मुळे यांना सतत मारहाण करीत होता. मयत सुरज मुळे याच्या त्रासाला कंटाळून धिरज हा आई व बहीणीला घेवून पुणे येथे कामासाठी निघून गेला होता. त्यामुळे धिरज मुळे याचे मनात मयत भाउ सुरज याचे बाबतीत प्रचंड राग व चिड निर्माण झालेली होती. अशी गोपनीय माहीती मिळाली होती. त्या वरून वर नमुद गुन्हयातील संशयीत आरोपी धिरज गोविंद मुळे यास ताब्यात घेवून त्यास विश्र्वासात घेवून विचारपूस केली असता. मयत सुरज मुळे याचा भाऊ धिरज गोविंद मुळे यांने आपल्या गुन्ह्याची कबूली देत सांगण्यास सुरूवात केली. कुटुंबीयांना मयत सुरज मुळे हा सतत दारु पिवुन त्रास देवुन मारहाण करीत असल्यामुळे धिरज मुळे याला सहन होत नव्हते. त्याने भाउ सुरज याला जिवानीशी ठार मारण्याचे कट रचला. धिरज मुळे यांने ही कल्पना त्याचा मित्र अमर अशोक गायकवाड (रा.भातखेडा ता.लातूर )यास सांगितली. या कामात मदत करण्यास अमर गायकवाड यांने संमती दर्शवली. ०७/०२/२३ रोजी पहाटे ०३:०० ते ०३:३० च्या सुमारास धिरज आणी त्याचा मित्र अमर अशोक गायकवाड (रा.भातखेडा ता.लातूर) हे दौघे लातुर येथुन अमर याची मोटार सायकल घेवुन भातखेडा गावी पोहंचले. दरम्यान अमर गायकवाड यास घराबाहेर रेखी करण्यासाठी सांगतले. सुरज राहत असलेल्या घरातील खोलीत स्वत धिरज मुळे हा गेलाघरामध्ये जावुन भाउ सुरज मुळे हा झोपेत असतांना त्याचेवर गावठी पिस्तुलातुन त्याचे डोक्यात गोळी झाडुन खुन केला. त्यानेतर दोन्ही आरोपी त्याच मोटार सायकलवर लातुर येथे परत आले व आरोपी धिरज मुळे हा पुणे येथे निघुन गेला. एकंदरीत वरील तपासादरम्यान असेही निष्पन्न झाले कि, आरोपी धिरज मुळे हा पुणे येथे एका खाजगी सुरक्षा एजन्सी मध्ये सुरक्षा रक्षक म्हणुन काम करत होता व स्वताचे लग्न जमविण्याठी गावी भातखेडा येथे जायाचे आहे असे खोटे सांगुन रजा घेवुन रात्रीतुन पुणे येथुन लातुर येथे येवुन व त्याचा मित्र अमर गायकवाड यास सोबत घेवुन दोघेही भातखेडा येथे जावुन अमर गायकवाड यास रेखी करण्यासाठी सांगुन स्वता धिरज याने स्वतःचा सख्खा भाऊ सुरज याच्यावर गोळी झाडुन त्याचा खुन करुन गुन्हयात वापरलेले गावठी पिस्तुल हे पुणे येथे त्याच्या मित्राच्या घरी लपवुन ठेवल्याचे निष्पन्न झाल्याने सदरचे गावठी पिस्तुल पुणे येथुन जप्त करण्यात आले व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल आरोपी अमर गायकवाड याचेकडुन भातखेडा येथुन जप्त करण्यात आले आहे. सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सोमय मुंडे, पोलीस अधिक्षक लातूर, डॉ. अजय देवरे, अप्पर पोलीस अधिक्षक लातूर, तसेच सुनिल गोसावी, उप विभागीय पोलीस अधिकारी उप विभाग लातूर ग्रामिण, पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे स्थागुशा लातुर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करुन व तपासाबाबत योग्य त्या सुचना देवुन अन्वेशन अधिकारी दिपककुमार वाघमारे पोलीस निरीक्षक पो. स्टे लातूर ग्रामिण सपोनि प्रतिभा ठाकुर, पोउपनि तानाजी पाटील, पोलीस अंमलदार विष्णु चौगुले, सतिष लामतुरे, सचिन चंद्रपाटले, राहुल दरोडे, नितीन पाटील तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे रवि गोंदकर, खुर्रम काझी, यशपाल कांबळे यांनी गुन्हा दाखल झालेपासुन २४ तासाचे आत आरोपी निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणुन वरील आरोपीतांना अटक केली आहे.

20 TO 26 FEBRUARY 2023 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2023 10:16 PM Page 1



# आजचा कार्यकर्ता भाजपात उद्याचा नेता होऊ शकतो –संजय केनेकर

**औसा/प्रतिनिधी**

भाजपाच्या केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची चर्चा गावागावात बुथ स्तरावर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी घडवून आणावी. ज्या कार्यकर्तेमुळे पक्ष वाढतो तो कार्यकर्ता उभा राहिला पाहिजे असे सागून कामातून, भूमिकेतून जनतेच्या मनात कार्यकर्ता किती रुजतो हे महत्वाचे आहे. आजचा कार्यकर्ता उद्याचा नेता भाजप पक्षातच होवू शकतो असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांनी केले.भारतीय जनता पक्ष लातूर जिल्हा कार्यकारिणीची बैठक शुक्रवारी औसा येथील विजय मंगल कार्यालयात भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून संजय केनेकर बोलत होते. या बैठकीस जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, खा. सुधाकर श्रंगारे, आ. अभिमन्यू पवार, प्रदेश उपाध्यक्ष माजी मंत्री विनायकराव पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर भालेराव, प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस दिलीपराव देशमुख, माजी खासदार सुनील गायकवाड, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, विक्रमकाका शिंदे, त्र्यंबकआबा गुट्टे, अशोककाका केंद्रे, रामचंद्र तिरुके, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, जिल्हा भाजपाचे अमोल पाटील, बापूराव राठोड, भागवत सोट, श्रीमती रेखाताई तरडे, मीनाक्षी पाटील, कल्पनाताई डांगे, दगडू साळुंखे, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, सुनील उटगे, शहराध्यक्ष लहू कांबळे, गोविंद चिलकुरे, रोहिदास वाघमारे, संध्या जैन, मुक्तेश्र्वर वांगदरे, अमोल निडवदे यांच्यासह अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.




या बैठकीस जिल्ह्यातील भाजपचे प्रदेश आणि जिल्हा पदाधिकारी मंडल पदाधिकारी कार्यकर्ते लोकप्रतिनिधी मोठय़ा संख्येने उपस्थित होते. जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत माजी पालकमंत्री आ, संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी राजकीय ठराव मांडून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना राज्याच्या विकासाची बसलेली घडी विस्कळीत करण्याचे काम गेल्या अडीच वर्षात उद्धव ठाकरे सरकारने केला. राज्यातील रोजगार व गुंतवणूक घटली. राज्याला मागे घेऊन जाण्याचे काम झाले असल्याचा आरोप केला. वॉटर ग्रीड प्रकल्पासह अनेक लोक कल्याणकारी बंद पडलेल्या योजना राज्यात नव्याने आलेल्या शिंदे फडणवीस सरकारने सुरू केल्या असल्याची माहिती देवून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्यासाठी भरीव निधी देणार असल्याची घोषणा करणाऱ्या या राज्य सरकारच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. या ठरावाला अनुमोदन देताना सुधाकर भालेराव आणि गणेश दादा हाके यांनी अभद्र युतीतील उद्धव ठाकरे यांच्या सरकारने शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची मदत केली नसल्याची टीका करून वैधानिक विकास महामंडळ राज्य शासनाने सुरू केल्याबद्दल अभिनंदन केले. कृषी व सहकार विषयक ठराव मांडताना आ. अभिमन्यू पवार म्हणाले की महाविकास आघाडी सरकारने एकही शेतकरी हिताचा निर्णय घेतला नाही. उलट शेतकऱ्यांच्या दुष्टीने महत्त्वाच्या आशा अनेक योजना बंद करून शेतकर्यांना धोका दिला. सुडबुध्दीने विकासाच्या योजना बंद केल्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने लातुर जिल्ह्यातील गोगलगाय प्रादुर्भावसह अतिवृष्टी व संततधार पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर करुन आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वाधिक ४२० कोटींची मदत केली. साखर उद्योगांन स्थिरता यावी यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीयमंत्री अमित शाहा यांनी निर्णय घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला.

याबरोबरच पेट्रोल व डिझेल मध्ये पंचवीस टक्के इथेनॉल वापरले जाण्याचा निर्णयामुळे इथेनॉल उत्पादनाला चालना मिळाली आहे सांगितले. या ठरावास अनुमोदन देताना विनायकराव पाटील आणि खा. सुधाकर शृंगारे यांनी केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या कृषी विषयक धोरणाची माहिती देऊन अनुमोदन दिले. यावेळी संजय केनेकर पुढे म्हणाले की, भाजप पक्षात कार्यकर्त्यांचे महत्त्व अधिक असून कार्यकर्त्याच्या कामावरच देशात भाजपाने उतुंग घवघवीत यश मिळविले. पंतप्रधान नरेंद्र जी मोदी साहेब यांच्या नेतृत्वातील केंद्रशासन आणि राज्यातील शिंदे फडणवीस यांच्या सरकारने घेतलेल्या विविध निर्णयाची माहिती जनजागृती खेड्यापाड्यात बुथ स्तरापर्यंत करावी असे आव्हान केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्य सरकारने औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे धाराशिव असे नामकरण केल्याबद्दल अभिनंदन करून संजय केनेकर म्हणाले की छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर असताना धर्म रक्षक नव्हते अशी भूमिका घेणाऱ्या अजित पवारांना मराठवाड्यात पाय ठेवताना दहा वेळा विचार करावा लागेल असा बंदोबस्त भाजपाच्या युवा मोर्चाने करावा असेही संजय केनेकर यांनी बोलून दाखविले. यावेळी बोलताना भाजपचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की पक्षाच्या संघटन आणि लोकप्रतिनिधी संख्या बाबतीत राज्यात लातूर जिल्हा एक नंबर असून या पुढील काळातही एक नंबर ठेवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपाच्या ताब्यात आलेल्या सर्व ग्रामपंचायतींना वीस लाख रुपयांचा विकास निधी राज्य शासन देणार असल्याची माहिती देऊन कार्यकर्त्याला ताकद द्यावी लागेल असे बोलून दाखविले. प्रारंभी जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रासह सर्वच क्षेत्रात दुर्दैवाने निधन पावलेल्या व्यक्तींना आदरांजली अर्पण करण्यासाठी शोक प्रस्ताव मांडला त्यास उपस्थितांनी दोन मिनीट स्तब्ध राहून श्रध्दांजली अर्पण केली. या बैठकीचे सुत्रसंचालन दिपक चाबुकस्वार यांनी केले. भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोषअप्पा मुक्ता यांनी आभार मानले.

# संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी**

शहरापासून जवळच असलेल्या आर्वीच्या सोमवंशी नगरातील संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनाचे उद्घाटन दीपप्रज्वलन व राजमाता जिजाऊ प्रतिमा पूजनाने करण्यात आले. या संमेलनाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे तर अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी.एन. केंद्रे उपस्थित होते. मंचावर प्राचार्य राजेंद्र जायेभाये, प्रा.कविता केंद्रे, मुख्याध्यापक ए.व्ही. पवार, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना दगडे म्हणाले की, ग्रामीण भागात चांगले शिक्षण मिळणे अवघड झाले आहे. मात्र, प्राचार्य डी.एन. केंद्रे यांनी १७ वर्षांपूर्वी आर्वी या गायरान भागातील उपेक्षीत, वंचित, बहुजन व सर्वसामान्य नागरिकांच्या लेकरा ना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी या शाळेची स्थापना केली. या शाळेत विद्यार्थ्यांना विनामूल्य शिक्षण तर दिले जातेच, पण विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी मोफत स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली आहे. केंद्रे यांनी शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविली आहे. शिक्षण व गुणवत्तेचं नातं संगमेश्वर विद्यालय जपत आहे. विद्यार्थ्यांनी या संधीच सोनं करून शैक्षणिक गुणवत्तेसोबत कला व सांस्कृतिक क्षेत्रातही नावलौकिक करावा, असे आवाहन शेवटी दगडे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले की, १७ वर्षांपूर्वी रोवलेल्या या शाळारूपी रोपट्याचे



वटवृक्षात रुपांतर झाले आहे. या शाळेत विनामूल्य शिक्षणासोबत दर्जेदार शिक्षण दिले जाते. त्यामुळेच या शाळेतील विद्यार्थी परीक्षेत सर्वच विषयात शंभर पैकी शंभर गुण मिळवत आहेत. या शाळेतील शिक्षक अतिशय परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करतात. नवीन शिक्षण प्रणाली, प्रात्यक्षिक यासह येत्या काळात विद्यार्थ्यांना अधिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही देत विद्यार्थ्यांनी वेळ, परिश्रम व सातत्य याची सांगड घालून उंच भरारी घ्यावी, असे आवाहनही शेवटी त्यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी कोळी गीते, लावण्या, भारुड, गवळण, चित्रपटातील गीते सादर करून उपस्थित पाहुणे, शिक्षक, कर्मचारी व पालकांच्या टाळ्या मिळविल्या विद्यार्थ्यांचे बहारदार नृत्य पाहून उपस्थितांनी शिट्या वाजवूनही दाद दिली. या प्रास्ताविक मुख्याध्यापक पवार यांनी केले. आभार जे.जी. कावळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी शिक्षक जी.बी. मोरे, डी.पी. दिवटे, आर.व्ही. डुकरे, डी.एस. भदभदे, एन.आर. मुंढे, ए.व्ही. माने, अनिल वाघमारे आदींनी परिश्रम घेतले.

# विद्यापीठ संगणकशास्त्र विषयाच्या मंडळावर डॉ.नितीश झुल्पे यांची निवड!

**लातूर/प्रतिनिधी**

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान विषयाच्या अभ्यास मंडळावर येथील कॉक्सिट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीश झुल्पे यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. झुल्पे हे १५ वर्षांपासून संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान या विषयाचे अध्यापन करीत आहेत. ते मागील ७ वर्षांपासून येथील कॉक्सिट महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत. त्यांनी संगणकशास्त्र विषयात अनेक संशोधने केली आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा संगणकशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्यात कॉक्सिटच्या प्राध्यापकांचा मोठा वाटा आहे. त्यात डॉ. झुल्पे यांची भूमिका महत्वपूर्ण असते. यापूर्वीही डॉ. झुल्पे हे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर



सहायक सदस्य होते. आता त्यांची निवड संगणशास्त्र व माहिती तंत्रज्ञान विषयाचे गाढे अभ्यासक म्हणून सदस्यपदी करण्यात आली आहे. याबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.एम.आर.पाटील, उपाध्यक्ष एल.एम. पाटील, कॉक्सिट ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. बी. एल. गायकवाड, कॉक्सिटचे उपप्राचार्य डॉ. व्ही.व्ही. भोसले, उपप्राचार्य डी.आर. सोमवंशी, विभाग प्रमुख डॉ. डी.एच. महामुनी, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, रजिस्ट्रार संतोष कांबळे, वरिष्ठ लिपिक प्रदीप कावळे यांनी अभिनंदन केले आहे.

# लातूर शहरातील रेल्वे आरक्षण आजपासून १२ तास सुरु राहणार

## खासदार सुधाकर शृंगारे यांच्या मागणी नंतर आरक्षण केंद्राची वेळ वाढवली

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर शहरातल्या जुन्या रेल्वे स्टेशनवरील आरक्षण कक्षाची वेळ वाढवून आठ तासावरून बारा तास करण्यात आली आहे. त्याची अंमलबजावणी आज पासून सुरुवात झाली आहे. शहरातील विद्यार्थी, व्यापारी, उद्योजक, सैन्य दलातील कर्मचारी अधिकारी यांच्या बरोबरच पर राज्यातून ये-जा करणाऱ्या प्रवाश्यांच्या सोयीसाठी रेल्वे आरक्षणाची वेळ आठ तासावरून दोन शिफ्टमध्ये बारा तासापर्यंत करण्यात यावी, अशी मागणी खासदार सुधाकर शृंगारे यांनी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. त्यानुसार रेल्वे आरक्षण कक्षाची वेळ आज पासून बारा तासापर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य शामसुंदर मानधना यांनी दिली आहे. लातूर शहरातून प्रवासासाठी ये-जा करणाऱ्या विद्यार्थी, व्यापारी, कर्मचारी, उद्योजकांची संख्या दिवसें दिवस वाढत असून त्यासाठी आरक्षण केंद्राची सुविधा किमान १२ तास करण्यात यावी अशी



मागणी करण्यात येत होती. नागरिकांची हि मागणी लक्षात घेऊन खासदार सुधाकर शृंगारे यांनी रेल्वे विभागाकडे १२ तास आरक्षण सुरु ठेवण्याची मागणी केली होती. त्यानुसार रेल्वे विभागाने सकाळी आठ ते रात्री आठ वाजे पर्यंत जुन्या रेल्वे स्टेशन वरील आरक्षण केंद्र सुरु ठेवण्यात येत असल्याचे आदेश काढले आहेत, त्याची अंमलबजावणी देखील आज पासून करण्यात येत आहे. तर लातूरच्या नवीन रेल्वे स्टेशनवरील आरक्षण केंद्र सकाळी आठ ते दुपारी चार वाजता पर्यंत पूर्वी प्रमाणेच सुरु राहणार आहे. लातूर रेल्वे स्टेशन शहरापासून दूर असल्याने आरक्षणासाठी रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या नागरिकांना ऑटोचे भाडे किमान २०० रुपये मोजावे लागतात. या शिवाय जेष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, महिला यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन आरक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी खासदार सुधाकर शृंगारे यांनी रेल्वे विभागाला पत्र पाठवून जुन्या रेल्वे स्टेशनवरील आरक्षण हे बारा तास सुरु ठेवण्यात यावे अशी मागणी केली होती. खासदारांच्या मागणीला लक्षात घेऊन रेल्वे विभागाने आता दोन शिफ्टमध्ये सकाळी आठ पासून ते रात्री आठपर्यंत आरक्षण कक्ष सुरुवात ठेवण्यात येत असल्याचे आदेश जारी केले आहेत. आरक्षण कक्षाची वेळ वाढविण्यात आल्याने लातूर शहरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहे. जुन्या रेल्वे स्टेशनवरील हा आरक्षण कक्ष अगोदर सकाळी ८ ते २ आणि दुपारी ४ ते ८ या वेळेत सुरु होता आता तो आज पासून बारा तास सुरु राहणार आहे.

# इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस ऑफ इंडियाच्या कार्यकारिणीची निवड

लातूर : इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस ऑफ इंडियाच्या लातूर शाखेच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून लातूर शाखाध्यक्षपदी सीए विश्र्वास जाधव यांची निवड करण्यात आली. सन २०२३-२४ या वर्षासाठी लातूर शाखेची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यात उपाध्यक्षपदी सीए राहुल धरणे, सचिवपदी सीए महेश तोष्णीवाल आणि कोषाध्यक्ष म्हणून सीए निलेश बजाज यांची निवड करण्यात आली.वेस्टर्न इंडिया स्टुडन्ट कौन्सिल असोसिएशनचे चेअरमन म्हणून सीए एकनाथ धर्माधिकारी व सदस्यपदी सीए द्वारकादास भुतडा यांचीही निवड यावेळी घोषित करण्यात आली. यावेळी शाखेचे सभासद आणि शहरातील सीएंची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या आकराशे विद्यार्थ्यांनी दिली शिवचरित्रावर आधारित परीक्षा

**लातूर/प्रतिनिधी**

जेएसपीएम लातूरद्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय आणि एमकेसीएल यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त स्वामी विवेकानंद विद्यालयामध्ये शिवचरित्रावर आधारित घेण्यात आलेल्या परीक्षेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल ११०० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये विशेष गुणवत्ता मिळवणाऱ्या ५१ विद्यार्थ्यांना पारितोषिके तर सहभागी विद्यार्थ्यांना १९ फेब्रूवारी २०२३ रोजी शिवजयंतीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानीत केले जाणार आहे. जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष तथा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या संकल्पनेतून दरवर्षी शिवजयंतीनिमित्त अनेक उपक्रम राबविले जातात. त्या उपक्रमाचाच एक भाग म्हणून शिवजयंतीनिमित्त शिवचरित्रावर आधारित परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयाची अंमलबजावणी स्वामी विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य गोविंद शिंदे यांनी केली असून शिवचरित्रावर घेण्यात आलेल्या परीक्षेत ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातील ५१ विद्यार्थ्यांनी विशेष गुणवत्ता मिळविली असल्यामुळे १९ फेब्रूवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत घेण्यात येणार कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच सहभागी शिवप्रेमी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या शिवचरित्रावर आधारित परीक्षेच्या यशस्वीतेसाठी सिनर्जी एन्फोटेकचे प्रमुख महेश पत्रिके, प्राचार्य गोविंद शिंदे, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, व्यंकटराव कांबळे, संगादेव आवस्कर, अलका अंकुशे आदींनी परिश्रम घेतले. त्यांच्या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिव तथा माजी जि.प.अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, प्रशासकीय समन्वयक निळकंठराव पवार, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील,समन्वयक विनोद जाधव, समन्वयक बापूसाहेब गोरे आदींनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


## वसई-विरार शहर महानगरपालिका

**सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्यालय, विरार (पुर्व)**

**जाहीर ई-निविदा सूचना क्र.**

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | विरार (प.) प्रभाग क्र. १३ मधील डोंगरपाडा परिसर व प्रभाग क्र.२० मधील विरार (प.) येथील स्टेशन परिसरातील गटारावरील नादुरुस्त स्लॅब तसेच फुटपाथवरील नादुरुस्त चेकर्ड टाईल्स दुरुस्ती करणे. |
| २. | विरार (प.) प्रभाग क्र. २९ मध्ये विराटनगर येथील ज्योती पाम्स ते मुख्य गटारापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे. |
| ३. | विरार (प.) प्रभाग क्र. २९ मध्ये विराटनगर येथील यंगस्टार हॉल ते सुधा पॅलेस पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे. |
| ४. | विरार (प.) प्रभाग क्र. २९ मधील विराटनगर परिसर व प्रभाग क्र.३१ मधील विरार (प.) येथील स्टेशन परिसरातील गटारावरील नादुरुस्त स्लॅब तसेच फुटपाथवरील नादुरुस्त चेकर्ड टाईल्स दुरुस्ती करणे. |
| ५. | विरार (प.) प्रभाग क्र. १३, १६, २०,२९, ३१ मधील इतर कामांची दुरुस्ती करणे. |
| ६. | विरार (प.) प्रभाग क्र. ३५ मध्ये भाजी गल्ली येथे स्नेहा अपार्ट ते माया अपार्ट. पर्यंत गटाराचे काम व इतर काम करणे. |
| ७. | विरार (प.) प्रभाग क्र. ३५ मध्ये घोसाळी येथे फ्रान्सीस तुस्कानो ते कातू तुस्कानो यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे. |
| ८. | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ए', बोळींज येथे वॉर्ड क्र. ३५ मध्ये उमराळा येथे पुनाडी गाव ते रबलई गावपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| ९. | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ए', बोळींज येथे वॉर्ड क्र. ३५ मध्ये उमराळा मराडी गाव ते मराडी क्रॉस रस्ता डांबरीकरण करणे. |
| १०. | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'ए', बोळींज येथे वॉर्ड क्र. ३५ मध्ये वटार अगोदी वाडी ते मेन रोडपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ११. | विरार (प.): प्रभाग क्र. ३५मध्ये उमराळे येथे बॅसिन कॅथोलिक बँक ते नानभाट रस्ता येथील विविध ठिकाणी गटावरावर स्लॅब टाकणे. |
| १२. | विरार (प.) प्रभाग क्र. ३५ मध्ये वटार येथे मोरेश्वर बंगला ते मुख्य रस्त्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे. |

खालील कामांचे कोरे विविदा फॉर्म या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/०२/२०२३ पासून उपलब्ध होणार आहे. ई-टेंडरिंगबाबत अधिक माहितीसाठी ई-निविदा कक्ष, वसई-विरार शहर महानगरपालिका, विरार (मुख्यालय) येथे संपर्क साधावा.

जा.क्र.: वविशम/सार्व.बांध/५०६/२०२३
दिनांक : १०/०२/२०२३
Please Visit our official web-site
(http://mahatenders.gov.in)

**सही/-**
**उप आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी**
**प्रभाग समिती 'ए'**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# असत्यमेव जयते!

'क्या कानून क्या, चूनाव आयोग'
सबका इमान पैसे पे डोलता है ।
सच्चाई को बाजार मे बेचकर
पैसा हर जगह बोलता है!!'

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे आणि त्यांच्या निष्ठावान सहकाऱ्यांनी मोठ्या कष्टाने स्थापन केलेल्या शिवसेनेची बाळासाहेबांचे बोट धरून वाढलेल्या भाजपने वाट लावली. कारण हिंदुत्वाच्या एकच म्यानात भाजप आणि शिवसेना हे दोन पक्ष राहू शकत नाही हे वास्तव भाजपतील बामणानाच ठाऊक होते. आणि म्हणूनच त्यांनी महाराष्ट्रात मुंगी होऊन साखर खात हळू हळू शिवसेना पोखरली आणि बाळासाहेबांनी या जगाचा निरोप घेताच आपले खरे रूप दाखवायला सुरुवात केली. एकाच वेळी शिवसेनेचे ४० आमदार फोडून सरकार पाडले आणि ज्या भाजपने शिवसेना संपवण्याचा विडा उचलला होता त्यांच्या मदतीने सरकार बनवले. सेनेतील फुटीर एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी आता शिवसेनेचे अस्तित्वच संपवून टाकण्याचा प्रयत्न चालवला आहे. केंद्रात भाजपचे पूर्ण बहुमताचे सरकार असल्याने सरकारच्या मदतीने न्यायपालिका आणि निवडणूक आयोग यांच्यावर दबाव टाकून शिवसेनेचे नाव आणि निशाणी दोन्ही छिनुन घेतली. त्यामुळे उद्धवच्या नेतृत्वा खालील शिवसेनेचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. कारण आता न्यायपालिका असो की निवडणूक बहुमताचा विचार करूनच निर्णय दिला जाणार. अर्थात त्यासाठी पैशाची देवाण-घेवाण होतेय हे वेगळे सांगायची गरज नाही. पण त्याने देशात एक वेगळा पायंडा पडला आहे. कारण आता कुठल्याही पक्षाचे लोकनियुक्त बहुमताचे सरकार सहजपणे पाडता येईल. एखाद्या उद्योगपतीने सरकार पाडायचे ठरवल्यास एखाद्या बामण नेत्याला हाताशी धरायचे आणि विरोधी पक्षातील आमदारांना खोके देऊन आमदार फोडायचे त्यानंतर बहुमताच्या जोरावर तो पक्षच संपवून टाकायचा आणि फुटलेल्या गद्दार आमदारांना न्यायपालिका आणि निवडणूक आयोगाकडून संरक्षण देऊन त्या गद्दार फुटिरणा राजकीय गटार गंगेत बुडवून पवित्र करून घ्यायचे हे धंदे सध्या सुरू झालेत. त्यामुळे याच पद्धतीने देशातील कुठल्याही पक्षाचे सरकार पाडून तो पक्ष कायमचा संपवण्याचा कायदेशीर मार्ग केंद्राच्या मदतीने तयार झाला आहे. शिवसेनेचे भविष्यात काय होणार हा मुद्दा बाजूला ठेवला तरी याच मुद्याच्या आधारे आता देशातील इतर पक्षांचे अस्तित्व संपवून टाकण्याची एक नवी पद्धत देशात रूढ होत आहे. आणि या पद्धतीने विरोधी पक्षाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे, तर निवडणूक आयोग आणि न्यायपालिका या आता स्वयत संस्था राहिलेल्या नाहीत तर त्या केंद्र सरकारच्या बटीक आणि पैशाच्या गुलाम बनल्या आहेत असे लोक उघडपणे बोलू लागले आहेत. शिवसेनेच्या बाबतीत मोठा गेम झाला आहे हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही. कारण न्यायालयात पात्र अपात्र तेचा मुद्दा प्रलंबित असताना निवडणूक आयोगाने शिवसेनेचे नाव आणि निवडणूक चिन्ह शिंदे गटाला देऊन टाकणे हा सेटिंग झाल्याचा सक्षम पुरावा आहे. फक्त यात किती कोटींची डील झाली हाच चौकशीचा भाग आहे, असे लोक उघडपणे बोलत आहेत. निवडणूक आयोगाने म्हणे आमदार-खासदार यांची आकडेवारी आणि त्यांना मिळालेली मतांची टक्केवारी यांचे केलक्युलेशन करून निर्णय दिला आहे, मग दोन्ही पक्षांचे पदाधिकारी आणि सदस्य संख्यांच्या कागदांची रद्दी कशाला मागवली होती? याचे उत्तर निवडणूक आयोगाने द्यावे. पण सगळाच खेळ पैशाचा असल्याने निवडणूक आयोगाकडे याचे उत्तर नाही असे लोक म्हणत आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग असो की न्यायपालिका यांच्यावर आता कसा आणि का विश्वास ठेवायचा असा प्रश्न लोक विचारीत आहेत. पण या सर्व गोष्टींना एकच पक्ष जबाबदार आहे. त्याचे काय करायचे हे आता लोकांच्या हातात आहे. त्यामुळे या वर्षी होणाऱ्या ९ राज्याच्या विधानसभा निवडणुका आणि पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुका हेच आता लोकांच्या हाती मोठे हत्यार आहे आणि लोकशाही वाचवण्यासाठी निवडणुकीत या हत्यारांचा वापर व्हायलाच हवा अन्यथा या देशाचे आणि इथल्या लोकशाहीचे काही खरे नाही. लोकांच्या मनात जोवर चीड निर्माण होत नाही आणि या चिडी मधून लोकांमधे या देशाचे अस्तित्व आणि लोकशाही वाचवण्याचा निर्धार निर्माण होत नाही तोवर या देशातील सुख शांतीने जगण्याचा प्रयत्न करणारे आणि या देशाच्या विकासात योगदान देणारे लोक सुरक्षित नाहीत. न्यायपालिका किंवा निवडणूक आयोगासारख्या स्वयात संस्था किंवा इडी, सीबीआय आणि आयकर खात्यासारख्या तपास यंत्रणा या केंद्राच्या मुठीत असल्याने या संस्थांवर विश्वास ठेवणे धोक्याचे आहे. शिवसेनेसारख्या पक्षाने न्यायपालिका आणि निवडणूक आयोग यांच्यावर विश्वास ठेऊन चूक केली असे आम्हाला वाटतेय असे शिवसेनेला मानणारे लोक आता उघडपणे बोलू लागलेत. त्यामुळे आता शिवसैनिकांनी आपल्या मूळ स्वरूपात येणे आणि त्याच वज्रमूटीचा धाक शत्रूवर कायम ठेवणे हाच एकमेव उपाय आहे असे लोकांचे म्हणणे आहे.

# शेतकरी मंत्रालय स्थापन व्हावे यासाठी गडचिरोली येथे चर्चासत्र



शेतकरी- वारकरी - कष्टकरी महासंघाच्या जनजागर यात्रेचे गडचिरोली येथे आगमन झाल्यावर भव्य स्वागत करण्यात आले. ही जनजागर यात्रा शेतकरी नेते श्री धनंजय पाटील काकडे यांच्या नेतृत्वात देहू ते पंढरपूर येथे जात आहे. तीर्थक्षेत्र देहू येथून दि.१ फेब्रु.२०२३ ला निघालेली जनजागर यात्रा पुढे भेटी देत, स्व. शरद जोशी यांचेस्मृती स्थळ आंबेठाण, ओझरगणपती, शिर्डी, नाशिक, गुरुकुल आश्रम, मोझरी, सेवाग्राम, नागपूर असा मार्गक्रमण करीत पुढे अड्याळ टेकडीवरून दि १४ फेब्रुवारी २०२३ ला दुपारी दोन वाजता गडचिरोली येथे पोहोचली. शासकीय रेस्ट हाऊस गडचिरोली येथे गुरुदेव सेवक मंडळी, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व आरपीआय चे संयुक्त आघाडीचे नेते बैठकीला उपस्थित होते. पुढे ही जागर दिंडी चंद्रपूर, राळेगाव, यवतमाळ वरून वाशिम, सोलापूर, पंढरपूरला जात आहे. तसेच दीं.२१ फेब्रुवारी २०२३ला (सांगोला रोड ग्रामगीता दर्शन मंदिर) पंढरपूर येथे या जनजागर यात्रेचा समारोप होईल. देशाला आर्थिक स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे शरद जोशी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून अड्याळ टेकडी येथे ग्राम स्वराज्याची संकल्पना स्व. तुकाराम दादा गीताचार्य यांनी मांडली. वारकरी संप्रदाय पंढरीच्या दर्शनाला जाऊन दरवर्षी विठ्ठलाला साकडे घालतो, पाऊस येऊ दे व शेतकरी सुखी होऊ दे. प्रत्येक आषाढी एकादशीला व कार्तिक एकादशीला मुख्यमंत्री सुद्धा तेच गाणे गातो, पाणी येऊ दे व शेतकरी सुखी होऊ दे, मग राजा आणि प्रजा दोघेही सारखेच मागणी घालत असताना शेतकरी का सुखी झाला नाही? तर १८ जून १९५१ ला १५० शेतकरी विरोधी कायदे होऊन शेतकरी संपविण्याचे कटकारस्थान रचण्यात आले. हे कायदे रद्द झाल्याशिवाय शेतकरी सुखी होऊ शकत नाही. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना गुरुदेव सेवा मंडळाचे जिल्हाध्यक्ष डॉ.शिवनाथ कुंभारे म्हणाले-ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेसाठी ग्रामसभा ही सर्वोच्च आहे, ग्रामसभेला गावातील लोकांनी उपस्थित राहून गावातील एकत्र निर्णय घ्यावे व विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करावे. शेतकरी- वारकरी- कष्टकरी महासंघाचे अध्यक्ष श्री धनंजय पाटील काकडे म्हणाले- शेतकरी हा देशाचा कणा आहे, परंतु राज्य व केंद्र शासनाने त्याला बंधनात अडकवून शेतकरी विरोधी कायदे तयार केले, त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक अडचणीतून जावे लागते. शेतकऱ्यांनी जर शेतीमालाला भाव मागितला तर त्याच्यावर अश्रुधुराचे नळकांडे, गोळीबार व कोर्ट केसेस दाखल करून, तो शेतकरी कायद्याच्या व शासनाच्या नजरेत गुन्हेगार असतो. केंद्र शासनाने वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा केला. वाघ, डुक्कर, अस्वल, नीलगाई, हरण, वानर यां वन्य प्राण्यांमुळे पिकाची नासाडी होऊ नये म्हणून शेतावर पहारा द्यावा लागतो व रात्रीला शेतात पाणी द्यावे लागते. या देशात वन्य प्राण्यांना संरक्षण आहे पण शेतकऱ्यांना संरक्षण नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे जीवनमान धोक्यात चालले आहे. शेतकरी विरोधी कायद्यामुळे शेतकरी, हवालदिन व मेटाकुटीस आला. शासन औद्योगीकरण व शहरीकरणाला डोक्यावर घेऊन नाचत आहे व शेतकऱ्यांना जिवंत मारते. सर्व जाचक अटी या शेतकऱ्यालाच का भोगाव्या लागतात? भारतीय अर्थव्यवस्थेत शेतकऱ्यांची




भूमिका ही अनमोल आहे. राज्य व केंद्रशासन चुकीचे धोरणे राबवत असल्यामुळे त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी या देशात शेतकरी मंत्रालय स्थापन झाले पाहिजे. या देशात क्रीडा मंत्रालय आहे. शेतीच्या व्यवस्थेसाठी कृषी मंत्रालय, महसूल मंत्रालय आहे, परंतु यातूनच शेतकऱ्यांचे प्रश्न निर्माण झाले व तेच प्रश्न सोडविण्या साठी, शेतकऱ्यांना न्याय, व हक्कासाठी मात्र शेतकरी मंत्रालय झाले नाही. ही या देशातील मोठी शोकांतिका आहे? यावर सर्विस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चा सत्रात अरविंद वासेकर, पंडित पुरके, गुरुदेव भोपाये, रोहिदास राऊत, पांडुरंग घोटेकर, राजू जक्कवार, हंसराज उंदीरवाडे, अशोक खोब्रागडे, अरुण नेताम, सालोटकर व भास्कर नरूले, सुशीला वगरे बडनेरा, अर्पित लांजेवार, लक्ष्मीबाई पिसे अमरावती व शहरातील अनेक नामवंत वकील, तसेच डॉक्टर्स व पत्रकार मंडळी यावेळी हजर होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरुण भाऊ मुनघटे यांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमाला चंद्रपुर, अमरावती इत्यादी ठिकाणचे प्रतिष्ठित व्यक्ती व गडचिरोली येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

– धनंजय पाटील काकडे

# चला जाणूया शासकीय कार्यालयाचे कामकाज!

**राज्य शासनाचे विविध विभाग ठाणे जिल्ह्यात कार्यरत आहेत. या विभागांमध्ये कोणकोणती कामे चालतात, सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या कामांसाठी कोणाशी संपर्क साधावा, तक्रारींसाठी कुठे संपर्क साधावा आदी माहिती नागरिकांना हवी असते. ती माहिती नागरिकांना व्हावी, यासाठी ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने विविध विभागांची माहिती देण्यात येत आहे. आज आपण जाणूया अन्न व औषध प्रशासन विभागाअंतर्गत असलेल्या औषध प्रशासन विभागाची माहिती...**

अन्न व औषध प्रशासन, (औषधे) ठाणे जिल्हा

औषध प्रशासन काय काम करते ? : अन्न व औषध प्रशासन ही वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करणारी यंत्रणा आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियमाअंतर्गत फुटकळ विक्री, घाऊक विक्री यासाठी अनुज्ञप्ती (परवाने) देणे तसेच औषधे व सौंदर्य प्रसाधने मेडिकल डिव्हाइसेस क्लास ए, क्लास बी करीता उत्पादन अनुज्ञप्ती देणे तसेच कायद्याअंतर्गत धारण केलेल्या परवानाधारकाची नियमितपणे तपासणी करणे.

औषध है विशिष्ट दर्जाचे गुणवत्तेचे असावे, कुठेही विनापरवाना औषधे तयार होऊ नये यासाठी प्रशासन कायम दक्ष असते. औषध कारखान्याचे घाऊक व किरकोळ व्यापाऱ्याची अन्न व औषध प्रशासन नियमितपणे पाहणी करत असते. सदर पाहणीमध्ये उत्पादन बनवण्याची पध्दती, दर्जा तपासणीच्या पद्धती, औषधाची साठवण, कच्च्या मालाचा दर्जा व इतर कागदपत्रे यांची पडताळणी केली जाते. हॉस्पीटल, औषधाचे दुकाने, उत्पादक औषध कारणाने वगैरे मधून औषधाचे नमुने वेळोवेळी गोळा केले जातात व तपासले जातात. या सर्व पडताळण्या व तपासण्यामध्ये जर काही आक्षेपार्ह आढळले, औषधाचा दर्जा आदर्श नसला तर कडक कायदेशीर कारवाई केली जाते.

प्रशासनाचे ध्येय : औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९८५ अंतर्गत नागरीकांना उत्तम प्रतिचे औषधे व सौंदर्य प्रसाधने उपलब्ध करून देणे त्याच बरोबर माफक दरात औषधे उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे अत्यंत महत्वाचे ध्येय आहे.

मुदत संपलेली औषधे (एक्झपायरी मेडिसीन) मिळाल्यास कोठे तक्रार करावी? : प्रत्येक जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय असते. सहायक आयुक्त हे कार्यालय प्रमुख असतात. प्रत्येक जिल्ह्यासाठी औषध निरीक्षक हे अधिकारी कार्यरत असतात. ग्राहकांनी जिल्हा कार्यालयातून माहिती काढुन त्यांच्या विभागातील औषध निरीक्षकांशी संपर्क करावा. ग्राहक आपली तक्रार कागदपत्रे, संशयित भाव, इतर पुरावा यासह नोंदवू शकतात. या खेरीज अन्न व औषध प्रशासनाच्या संकेतस्थळावरील फिडबॅकद्वारे तक्रार नोंदवू शकतात. तसेच औषध प्रशासन आयुक्तालयात ग्राहक संरक्षण व तक्रार निवारणासाठी स्वतंत्र कक्ष असून टोल फ्री क्र. १८००२२२३६५ वर तक्रार नोंदविता येते. इंटेलिजन्स ब्रँचमध्ये या कामासाठी खास पथक असते. हे पथक औषध प्रशासनचे अधिकारी, पोलिस खबरे, वॉच डॉक्स यांच्याबरोबर सहकार्याने काम करतात.

काऊंटर सेल व प्रिस्क्रीप्शन मेडिसिन यातील फरक? : प्रिस्क्रिप्शन आणि नॉन प्रिस्क्रिप्शन (ढोबळपणे, ओव्हर द काऊंटर, ओटीसी म्हणजे प्रिस्क्रीप्शनशिवाय) अशी औषधांची वर्गवारी आहे. प्रिस्क्रीप्शन केलेल्या औषधावर Rx ही खूण Warning as Schedule & Drugs Warming. To be Sold by retail on the Prescription of a Register Medical Practitioner only व लेबलवर डाव्याबाजूला लाल रंगाची उभी रेख असते. या खुणावरून ग्राहक प्रिस्क्रीप्शनचे औषध ओळखू शकतो.

किमान किरकोळ विक्री किंमत (एमआरपी) पेक्षा जास्त दराने औषध विक्री होऊ शकते काय? : नाही. कुठल्याही औषधांची किंमती ही डीपीसीओ (The Drugs Prices Control (जीवशी १९९५) नुसार ठरविण्यात आलेली आहे. औषधांची जास्तीत जास्त किंमत ठरविलेली असते. म्हणून कोणतेही औषधे एमआरपीपेक्षा जास्त दराने विकत असल्यास त्याबाबत सबंधित जिल्हा कार्यालयात तक्रार करावी.

नशेच्या औषधांबाबत खबरदारी : गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोपचारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (NDPS ct 1985) अंतर्गत एखाद्या व्यक्तीकडे कोणत्या प्रकारचे औषध आहे. ते औषध अंमली पदार्थ किंवा गुंगीचे आहे का आणि ते बाळगण्याचे उद्दिष्ट जाणून घेतले जाते. एनडीपीएस कायद्यानुसार गुंगीचे औषध विकणे हा गंभीर गुन्हा समजला जातो.गुंगीकारक औषधे हे फक्त चिकित्सकाच्या चिठ्ठीवर घेणे अभिप्रेत आहे व त्याचा दुरुपयोग होऊ नये याबाबत नागरिकांनी सतर्कता बाळगावी.

औषध विक्रेत्याने सीसीटीव्ही लावणे बंधनकारक आहे काय? : देशभरात अंमली पदार्थाचा गैरवापर व अंमली पदार्थाच्या औषध तस्करीला प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने होणाऱ्या अनुचित घटनांना प्रतिबंध लावण्यासाठी तसेच शेड्यूल एच व एच. १ औषधाचा गैरवापर होऊ नये व औषध विक्रेत्यांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाई प्रभावीपणे हाताळण्यासाठी मदत व्हावी या हेतूने सर्वसामान्य जनतेचे हित लक्षात घेता सीसीटीव्ही लावणे योग्य आहे.

ड्रग व मॅजिक रेमेडिजला (Drugs Magic Remedies) बळी पडू नका (पॉस्टर लावणे) : औषधे ही रसायने आहेत आणि ती अत्यंत काळजीपूर्वक वापरायला हवी. चुकीचे औषध घेणे, गरज नसताना घेणे घातक ठरु शकते. म्हणून ही औषधे तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच घ्यावीत अशी अपेक्षा असते. कोणत्याही जाहिरातीचा मुख्य उद्देश हा त्या उत्पादनाचा वापर, विक्री वाढविणे हाच असतो अणि त्यामुळे सेल्फ मेडिकेशन (स्वमनाने उपचार) वाढू शकतात, हे लक्षात घेऊन औषधाची विविध शेड्युलमध्ये वर्गवारी केलेली आहे. जी औषधे प्रिस्क्रीप्शन औषधे आहेत, म्हणजे डॉक्टरांच्या चिठ्ठीने त्यांच्या देखरेखीखाली घ्यावयाची असतात. त्यांच्या जाहिरातीस कायद्याने परवानगी नाही. ज्या आजारासाठी रोगमुक्तीचा दावा केला जाऊ शकत नाही, असे आजार शेड्युल जे मध्ये नमुद केलेले आहे. या खेरीज औषधे आणि मॅजिक रेमेडिज आक्षेपार्ह जाहिराती कायदा १९५४ अधिनियम १९५५ च्या अंतर्गत शेड्यूलमध्ये नमुद केलेल्या आजारांना बरे करण्याचा दावा करणाऱ्या औषधांची जाहिरात करण्यास बंदी आहे. औषध प्रशासन माध्यमात येणाऱ्या जाहिरातीवर लक्ष ठेवून असते व काही आक्षेपार्ह आढळल्यास कायदेशीर कारवाई म्हणजे कारणे दाखवा नोटीस देऊन उत्पादनाची मान्यता रद्द करते.

अन्न व औषध प्रशासनासबंधी कुठलीही चौकशी अथवा शंकांचे निरसन कसे करावे : अन्न व औषध विभागाच्या https://fdamfg.maharashtra.gov.in/login.aspx या संकेतस्थळावर गेल्यावर प्रत्येक विभागाच्या अधिकाऱ्याचे नाव व संपर्क क्रमांक दिलेला असतो. तसेच महत्त्वाचे लिंक या सुविधेवर माहिती मिळविता येते. तसेच अन्न व औषध प्रशासनासंबंधी कुठलीही चौकशी अथवा शंकानिरसन करण्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रातील औषध निरीक्षक अथवा सहायक आयुक्त अथवा सह आयुक्त यांच्याशी संपर्क करू शकता. अथवा प्रशासनाचे टोल फ्री क्र. १८००२२२३६५ वर संपर्क साधून माहिती घेऊ शकता.




# मांडागाव येथे बाल आनंद मेळावा उत्साहात साजरा

वाडा : वाडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा मांडागाव केंद्रशाळा - कंचाड येथे बाल आनंद मेळावा उत्साहात पार पडला. मांडा-वावेघर ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच वेदिका दळवी, उपसरपंच पंढरी सुतार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद घोडविंदे, उपाध्यक्ष भावना भाई मोर, ग्रामपंचायत सदस्य व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यानी वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या, फळे, खेळण्याची दुकाने व खाद्यपदार्थाचे स्टॉल मांडले होते. गावातील ग्रामस्थ तसेच पालक वर्गानी मोठ्या उत्साहाने बाल आनंद मेळाव्यास भेट दिली. वेगवेगळ्या खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण अमुले, धनश्री पाटील, शिवानंद गंगाधर कदम व किशोर बाबु पवार आदी उपस्थित होते.

# देवणी नगर पंचायत सभापती निवड बिनविरोध!



**देवणी/प्रतिनिधी**

येथील देवणी नगरपंचायतीच्या नियोजन व विषय समिती सभापतीच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या. वरील विषय समितीच्या निवडीसाठी दिनांक १७ फेब्रुवारी रोजी नगर पंचायत सभागृहात आयोजित विशेष बैठकीत या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. या निवडीमध्ये स्थायी समितीच्या अध्यक्षपदी पदसिद्ध अध्यक्षा म्हणून नगराध्यक्षा सौ कीर्तीताई घोरपडे यांची तर नियोजन समितीच्या सभापती पदी नगर पंचायतीचे उपाध्यक्ष अमित मानकरी यांची निवड करण्यात आली. इतर विषय समितीच्या सभापती निवडीमध्ये पाणीपुरवठा सभापती पदी नदीम मिर्झा तर बांधकाम सभापतीपदी प्रा. अनिल इंगोले यांची तर स्वच्छता व आरोग्य सभापती पदी शारदाताई आश्विन लांडगे आणि महिला व बालकल्याण सभापती पदी सौ.भाग्यलक्ष्मी रेवण मळभगे यांची निवड बिनविरोध जाहीर करण्यात आली. या निवडीच्या पिठासन अधिकारी म्हणून उपजिल्हा अधिकारी शोभा जाधव हे होते तर सहाय्यक म्हणून नगरपंचायतीचे मुख्याधिकारी गजानन शिंदे हे होते. या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा नगरपंचायतीकडून सत्कार करण्यात आला. या बैठकीस गटनेते जमीर तांबोळी, नगरसेवक प्रवीण बेळ्ळे, सौ. मेहरुनिसा इस्माईल शेख, सौ. रेणुका रमेश कोतवाल, सौ. बानूबेगम जाफर मोमीन, सौ वंदना राजकुमार बंडगर, अमित सूर्यवंशी, सौ सत्यभामा खंडेराव घोलपे, श्रीमती विमलताई विनायक बोरे, प्रा. महादेव मळभगे, योगेश ढगे यांची उपस्थिती होती.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# बंजारा समाजाच्या विकासासाठी वनार्टी आणि नंगारा बोर्ड स्थापणार-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**वाशिम/प्रतिनिधी**

बंजारा समाजाच्या विकासासाठी शासन सदैव सकारात्मक आहे. कुणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता शासन घेईल. बंजारा समाजाच्या विकासासाठी 'वनार्टी' (वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था) तसेच 'नंगारा बोर्ड' स्थापन करुन त्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी देणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोहरादेवी येथे केली. बंजारा समाजाचे आराध्य दैवत असलेल्या संत सेवालाल महाराज यांच्या पंचधातूच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण, सेवाध्वजाचे आरोहण व ५९३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भुमिपूजन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यानंतर आयोजित सभेत ते बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा वाशिमचे पालकमंत्री संजय राठोड, ग्रामविकास मंत्री गिरिश महाजन, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, महंत बाबुसिंग महाराज, खासदार भावना गवळी, खासदार प्रतापराव जाधव, उमेश जाधव, आमदार सर्वश्री ड. किरण सरनाईक, राजेंद्र पाटणी, संतोष बांगर, इंद्रनील नाईक, संजय रायमुलकर, निलय नाईक, विभागीय आयुक्त डॉ. दिलीप पांढरपट्टे, जिल्हाधिकारी षण्मुगराजन एस., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वसुमना पंत, पोहरादेवीचे सरपंच विनोद राठोड आदी उपस्थित होते. यावेळी पारंपरिक बंजारा पद्धतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच उपस्थित लोकप्रतिनिधींच्या हस्ते पोहरादेवी व उमरी येथील ५९३ कोटी रुपयांच्या निधीतून करण्यात येणाऱ्या विकासकामांच्या भुमिपूजन कोनशिलेचे अनावरण झाले. मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणाची सुरूवात गोर बंजारा बोलीत करून उपस्थितांची मने जिंकून घेतली. ते म्हणाले की, पोहरादेवी येथे आल्यावर काशीला आल्यासारखे वाटले. बंजारा समाज हा निसर्गपूजक आणि लढवय्या आहे. बंजारा समाजाच्या विकासासाठी नंगारा प्राधिकरण स्थापण्यासाठी शासनाने मान्यता दिली असून त्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केली. तसेच वसंतराव नाईक महामंडळालाही निधी कमी पडू देणार नाही. तांडा सुधार योजनेत प्रत्येक तांड्यावर पाणी, रस्ते इत्यादी मूलभूत सुविधा विकासासह शाळा, दवाखाने, अंगणवाडी यासारख्या सुविधाही उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन श्री. मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, विकासासाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल. नवी मुंबई येथे बंजारा समाज भवन स्थापन करण्यासाठी प्रयत्न करू. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच शासन सकारात्मक आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

**पोहरादेवीचा कायापालट करु -उपमुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही गोर बंजारा बोलीत भाषणाची सुरुवात करून उपस्थितांची मने जिंकली. ते म्हणाले की, बंजारा समाजाची काशी असलेल्या या स्थळाचा कायापालट करण्यासाठी शासन निधी कमी पडू देणार नाही. ज्याप्रमाणे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काशीचा कायापालट केला. त्याप्रमाणे बंजारा समाजाच्या काशीचा अर्थात पोहरादेवी तीर्थस्थळाचा कायापालट करू, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, संत सेवालाल महाराज यांनी दिलेल्या प्रतिज्ञा या केवळ बंजारा समाजासाठी नव्हे तर समस्त मानवतेच्या कल्याणासाठी आहेत. बंजारा हा एक प्राचीन समाज आहे. बंजारा समाजातील महापुरुषांनी त्याग आणि समर्पणाची मोठी परंपरा निर्माण केली आहे. एकेकाळी समृद्ध असणाऱ्या या गोपालक समाजाची आजची हलाखीची स्थिती सुधारण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे त्यांनी उपस्थितांना आश्वस्त केले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, तांड्यांचा विकास करण्यासाठी आराखडा तयार करून प्रत्येक तांड्यापर्यंत विकास पोहोचवू. बंजारा समाजातील मुला-मुलींचे शिक्षण थांबू नये यासाठी शासन उपाययोजना करेल. 'नॉन क्रिमिलेयर'ची अट रद्द करण्याबाबत महाधिवक्त्यांचे मत मागविण्यात येईल. पोहरादेवीचा विकास करण्यासाठी शासन निधीची कमतरता पडू देणार नाही. गोर बोलीचे संवर्धन करण्यासाठी अकादमी स्थापन करू. शासन संत सेवालाल महाराज यांचे कार्य पुढे नेण्यासाठी कटिबद्ध आहे, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. पालकमंत्री संजय राठोड यांनी बंजारा समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली. या कार्यक्रमात उपस्थित बंजारा बांधवांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमातून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले.

# सोलापूर जिल्हा परिषदेमधील कर्मचाऱ्यांनी वेतनत्रुटी अमान्य करून बक्षी समितीचा निषेध



**सोलापूर/प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या अनेक संवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनत्रुटी अमान्य करून बक्षी समितीने झेडपीच्या कर्मचाऱ्यांवर अन्याय केल्याच्या निषेधार्थ राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली कर्मचाऱ्यांनी अहवालाच्या प्रतिचे दहन करण्यात आले. कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे, लिपिकवर्गीय संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिवाश गोडसे, कास्ट्राईबचे अरुण क्षीरसागर, दिव्यांग कर्मचारी संघटनेचे लक्ष्मण वंजारी, आरोग्य संघटनेचे नागेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी दुपारी झेडपीचे कर्मचारी एकत्र आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी बक्षी अहवालच्या निषेधाच्या घोषणा दिल्या. कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष देशपांडे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाने नुकताच बक्षी समितीचा खंड २ चा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात जिल्हा परिषदेच्या अनेक संवर्गामध्ये मुख्यत्वे लेखा, लिपिक या संवर्गाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनत्रुटी दूर केली नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरल्याचे स्पष्ट केले.

अविनाश गोडसे म्हणाले की झेडपीच्या अनेक कर्मचारी संघटनांनी बक्षी समिती आयोगासमोर त्यांच्या वेतनत्रुटीबाबत साक्ष देऊन आवश्यक ती कागदपत्रे दाखल करूनसुद्धा बक्षी समितीने त्याचा विचार न केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. उपस्थितांनी बक्षी आयोगाचा निषेध करून अहवालाच्या प्रतिची होळी केली. झेडपी मुख्यालयाबरोबरच करमाळा, बार्शी, मंगळवेढा पंचायत समितीतील कर्मचाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देऊन निषेध व्यक्त केला.

## मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, केंद्रिय मंत्री पुरुषोत्तम रूपाला, मच्छिमार बांधवाशी साधणार संवाद!

**पालघर** : पुरुषोत्तम रूपाला, केंद्रिय मंत्री मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, भारत सरकार हे अन्य केंद्रिय मंत्र्यासह दि. २०/०२/२०२३ रोजी पालघर जिल्ह्यातील सातपाटी येथे सकाळी १०.३० वाजता येणार असून त्या ठिकाणी सुमारे २०० मच्छिमार बांधवाशी संवाद साधणार आहे. तसेच दुपारी ४.३० वाजता वसई (पाचूबंदर) येथे भेट देणार असून त्या ठिकाणी ठाणे व पालघर जिल्ह्यातील सुमारे ४००० मच्छिमार बांधवांच्या उपस्थितीत जाहिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. असे सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय ठाणे-पालघर यांनी कळविले आहे.

# भिवंडी निजामपूर महापालिकेच्यावतीने संत सेवालाल महाराज जयंती साजरी!



**भिवंडी/अभिजित हिरे**

क्रांतिसिंह संत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वतीने महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे तळमजल्यावरील आवारात संत सेवालाल महाराज यांचे प्रतीमेस प्रशासक तथा आयुक्त विजयकुमार म्हसाळ यांच्या निर्देशाप्रमाणे दीपक पुजारी मा. उपायुक्त (मुख्यालय) यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. क्रांतिसिंह संत सेवालाल महाराज (१५ फेब्रुवारी १७३९-४ जानेवारी १७७३) हे थोर मानवतावादी संत होते. शूरवीर लढवय्या 'गोर बंजारा' समाजातील सतगुरू होते. क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील गुट्टी तालुक्यातील गोलाल डोडी गावात झाला. आता ते गाव सेवागड या नावाने ओळखले जाते.सेवालाल महाराज हे एक भारतीय सामाजिक-धार्मिक क्षेत्रातील एक सुधारक होते. संत हाथीराम बाबा यासह हा शुरवीर बंजारा समुदाय त्यांना आपले आध्यात्मिक गुरू म्हणून मानतात. ते जगदंबेचे परम शिष्य होते. आयुष्यभर ब्रह्मचारी राहिले. रामावत क्षत्रिय कुळातील भीमासिंह नाईक यांचे ते चिरंजीव होते. अशा थोर संताची जयंती भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने साजरी करण्यात आली. याप्रसंगी महानगरपालिकेचे उपायुक्त (कर) दीपक झिंजाड, उपायुक्त प्रणाली घोंगे, कार्यकारी अभियंता सुनील पाटील सहाय्यक आयुक्त नितीन पाटील, उद्यान अधीक्षक निलेश संखे, समाज कल्याण अधिकारी स्नेहल पुण्यार्थी, प्रभाग अधिकारी सुदाम जाधव, आरोग्य विभाग प्रमुख जे. एम.सोनावणे, विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वरचे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत निबंध स्पर्धेत घवघवीत यश!



**लातूर/प्रतिनिधी**

येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सहाय्यक संचालक आरोग्य सेवा कुष्ठरोग, लातूर यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत घवघवीत यश संपादन केलेले आहे. लातूर जिल्ह्यात कुष्ठरोगाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होण्याकरिता आरोग्य शिक्षण विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. आरोग्य शिक्षण अंतर्गत शिक्षक विद्यार्थी यांना कुष्ठरोगाबाबत शास्त्रीय, तांत्रिक व वैद्यकीय माहिती मिळावी याकरिता शालेय, उच्च माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालय यांच्या तालुकास्तरीय निबंध स्पर्धाच्या आयोजन करण्यात येते. महाविद्यालयातील नुकत्याच घेण्यात आलेल्या स्पर्धेत खालील विद्यार्थी विजेते ठरले आहेत सर्वप्रथम चव्हाण स्वप्नाली मोतीराम सर्व द्वितीय गडेराव राहुल महेंद्र सर्व तृतीय चपटे ज्ञानेश्वरी बालाजी आणि उत्तेजनार्थ बक्षीसे अशी शिंदे पल्लवी प्रभाकर, व्हनाळे अक्षता, आनंद सूर्यवंशी कोमल अप्पाराव रोख रक्कम, ग्रंथभेटआणि प्रमाणपत्र असे पारितोषिकाचे स्वरूप होते. विजेत्या विद्यार्थ्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.विजयकुमार सोनी, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शीतल येरूळे, मराठी विभाग प्रमुख डॉ.रत्नाकर बेडगे व विजेत्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या स्पर्धेच्या संयोजनाकरिता डॉ. अशोक सारडा, जिल्हा वैद्यकीय अधिकारी एस.एस.फले, अवैद्कीय परीवेक्षक, आर.पी. केंद्रे, अवैद्कीय, सहाय्यक, व्ही.जी.आघाव अवैद्यकीय सहाय्यक यांनी सहकार्य केले. त्यांच्या या यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे, सचिव मन्मथप्पा लोखंडे आणि सर्व सन्माननीय संचालक मंडळ, प्राचार्य, उपप्राचार्य प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, विद्यार्थिनीने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत .

## शारदा इंटरनॅशनल स्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

लातूर : शारदा इंटरनॅशनल स्कूलमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी नववीच्या विद्यार्थ्यांनी निरोप समारंभ कार्यक्रम घेतला.कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने आणि प्राचार्य डॉ. अभिषेक शर्मा यांच्या प्रेरक भाषणाने झाली. स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याला भेटवस्तू आणि गुलाब पुष्प देऊन त्यांना निरोप दिले. यावेळी नववीच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

## भगवान बुद्धांच्या पवित्र अस्थिधातू कलशाचे दर्शन व ११० बौद्ध भिक्खूंची पदयात्रा



**वाडा/प्रतिनिधी**

थायलंड येथून आलेल्या ११० बौद्ध भिक्खूंची परभणी ते दादार चैत्यभूमी असा एकूण सहशे किलोमीटरच्या धम्मा पदयात्रेचे आयोजन केले असून भारतीय बौद्ध महासभा शहापूर तालुक्याच्या वतीने त्यांचे स्वागत व तथागत भगवान गौतम बुद्धांच्या पवित्र अस्थिधातू कलशाच्या दर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. शहापूर तालुक्यातील चेरपोली ग्रामपंचायत हद्दीत कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दरम्यान अनेक बौद्ध उपासाक बंधू भगिनींनी भगवान गौतम बुद्धांच्या पवित्र अस्थिधातू कलशाचे दर्शन घेऊन बौद्ध भिक्खूंचे आशीर्वाद घेतले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**पत्ता : कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे. ई मेल पत्ता :** eemsddkalwa@yahoo.co.in/ **दूरध्वनी क्र. ०२२-२५३७४७७०**

**ई-निविदा सूचना क्र. २३ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) ई-निविदा मागवित आहेत. ई-निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत | इसारा रक्कम | नोंदणीकृत वर्ग | मुल्य रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | वांद्री प्रकल्प ता.जि. पालघर येथील सेवाद्वारे आकार (१.२ x १.२ मी.)-२ नग स्क्रू स्टेम उच्चालक १५ टन -२ नग आपत्कालीन द्वार आकार (१.२ x १.२ मी.) -१ नग व आपत्कालीन द्वार रोप ड्रम उच्चालक व इतर घटक भागाची देखभाल दुरुस्ती काम. | रु. १७,५१,८१६/- | रु. १७,६००/- | यांत्रिकी विभागाकडे नोंदणीकृत असण्याची आवश्यकता नाही. | २०००/- + GST १८% |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २३/०२/२०२३ वेळ ते दिनांक ०९/०३/२०२३

ई-निविदा उघडणे : दिनांक १३/०३/२०२३

**खालील ठिकाणी निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in (सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा-ठाणे कार्यालयातील सूचना फलक.

३) कामाचे करारनाम्यात पश्चात अर्हता निकष समाविष्ट आहे.

**सही/-**
**(वि.चिं. गुंबाडे)**
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग,
कळवा-ठाणे

**जिमाका/पालघर/जाहि १०९/५५/२०२३ दिनांक : १६/०२/२०२३**


## मार्चअखेर निधी खर्च करा अन्यथा कारवाई-सीईओ संदीप कोहिणकर

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ दिलीप स्वामी मसुरीला प्रशिक्षणासाठी रवाना झाल्यावर त्यांचा पदभार घेतलेले संदीप कोहिणकर यांनी सोमवारी बांधकाम विभागाची बैठक घेऊन निधी वेळेत खर्ची घाला अन्यथा कारवाई केली जाईल असा इशारा दिला. मार्चअखेर जवळ आला आहे. या पार्श्वभूमीवर झेडपीचे प्रभारी सीईओ म्हणून पदभार घेतलेल्या संदीप कोहिणकर यांनी सोमवारी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. या बैठकीला बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, एन.एम. खराडे यांच्यासह उप अभियंता, शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता उपस्थित होते. सीईओ कोहिणकर यांनी



तालुकानिहाय बांधकाम विभागाची मंजूर कामे व आत्तापर्यंत झालेल्या खर्चाचा आढावा घेतला. मंजूर झालेल्या कामांची प्रगती तपासून निधी खर्ची पडला पाहिजे याची सर्वानी दक्षता घ्यावी. काम लागतील याची काळजी घ्यावी. मंजूर झालेल्या योजनांचा निविदा संपवून वर्क ऑर्डर द्यावी. कोणत्याही स्थितीत मंजूर झालेला निधी परत जाणार नाही याची काळजी प्रत्येक अभियंत्यांनी घ्यावी. निधी खर्ची न पडल्याबाबत तक्रारी आल्यास संबंधीतांवर कारवाई केली जाईल असा इशारा त्यांनी दिला.

20 TO 26 FEBRUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 2/18/2023 10:18 PM Page 1



# भिवंडीत दुचाकी चोरणाऱ्या चौकडीस पोलिसांनी केली अटक, सहा दुचाकी केल्या जप्त

**भिवंडी/प्रतिनिधी**



पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात दुचाकी सह वाहन चोरीच्या घटना वाढीस लागल्याने पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे, सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार यांनी सर्व पोलीस ठाणे क्षेत्रात अधिकाऱ्यांना आपापल्या भागात गस्त व नाकाबंदी करण्याच्या सूचना दिल्या नंतर शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने गुप्त बातमीदारा मार्फत माहीती घेऊन अलमास नवीद अहमद अंसारी वय २०, रा.समदनगर, एकलाख मुबीन असारी वय २२ रा.खान कंपाऊंड, जाफर रईस अहमद मोमीन वय १९ रा.पिराणीपाडा शांतीनगर, कैफ अब्दुल रौफ खान वय २० रा.मिर्झापुर उत्तर प्रदेश यांना ताब्यात घेवुन त्यांच्या कडे कसून चौकशी केली.त्यामध्ये त्यांनी सहा दुचाकी चोरीची कबुली दिली.पोलीस पथकाने त्यांच्या जवळून ३ लाख १० हजार रुपये किमतीच्या सहा दुचाकी जप्त करून शांतीनगर पोलीस ठाणे येथील चार व महात्मा फुले पोलीस ठाणे कल्याण येथील दोन अशा सहा दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांची उकल केली आहे. सदरची कामगिरी शांतीनगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर इंदलकर. पोलीस निरीक्षक निलेश बडाख पोलीस निरीक्षक गुन्हे विक्रम मोहिते. सह पोलीस निरीक्षक शैलेश म्हात्रे. पोउपनिरी भोला शेळके यांचा सहभाग होता.

# प्राथमिक आरोग्य केंद्र कुडुस येथे सायक्लोथॉनचे आयोजन



**वाडा/प्रतिनिधी**

केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार आयुष्यमान भारत आरोग्य वर्धिनीअंतर्गत मंगळवारी प्राथमिक आरोग्य केंद्र कुडुस येथे सायक्लोथॉन-सायकल फॉर हेल्थ' आयोजित करण्यात आले होते. प्रत्येक महिन्याच्या १४ तारखेला आरोग्याच्या विविध संकल्पेवर आधारित मेळावे आयोजित केले जातात. या महिन्याची संकल्पना स्वस्थ मन स्वस्थ घर' असून त्या अनुषंगाने आरोग्यासाठी सायकल चालवणे हे गरजेचे असून सायकलचे महत्त्व कळावे व जनजागृती व्हावी यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र ते पेट्रोल पंप कुडूस दरम्यान सायक्लोथॉन' आयोजित करण्यात आले होते. कुडूस ग्रामपंचायत सदस्या शिल्पा फुफाणे ,वैद्यकीय अधिकारी डॉ. समाधान पगारे यांच्या हस्ते हिरवे झेंडे दाखवून सुरुवात करण्यात आली.या प्रसंगी,आरोग्य अधिकारी व कर्मचारी तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.




# जि.प. कंचाड शाळेत मात्र पितृ दिन साजरा

वाडा : पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आज जगभरातील तरूणांमध्ये पाहायला मिळत असून व्हेलेन्टाइन डे नावाने साजरा होणाऱ्या १४ फेब्रुवारी या दिवशी वाडा तालुक्यातील कंचाड हायस्कूलमधे मात्र मातृपितृ पूजन दिवस पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी योगाच्या माध्यमातून अभ्यासात एकाग्रता कशी वाढविता येते याचे धडेही विद्यार्थ्यांना देण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक सी. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाने मंगळवारी सरस्वती विद्यामंदिर कंचाड या शाळेत मातृपितृ पूजन दिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी पालकांचे पूजन करुन त्यांचे आशिर्वाद घेतले असून यावेळी काहीसे भावनिक वातावरण झालेले पहायला मिळाले. श्री योगवेदांत सेवा समिति विरार व सरस्वती विद्यामंदिर कंचाड यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला असून शिक्षिका सीमा सूर्यवंशी, उमेश ठाकरे, कल्पेश चौधरी आदि शिक्षक व मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

# तळेगाव येथे सांडपाण्यावरुन एकास काठीने मारून जखमी केले

देवणी : देवणी तालुक्यातील तळेगाव येथे शेजाऱ्याने सांडपाणी नालीत न सोडता दारात का सोडत आहे. असे विचाल्यावरुन काठीने मारून जखमी केले. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात एकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. अशी माहिती शुक्रवार दि.१७ फेब्रुवारी रोजी देवणी पोलीसांच्या वतीने देण्यात आली. दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या घर शेजाऱ्यांने सांडपाणी नालीत न सोडता फिर्यादीचे दारात सोडल्याने फिर्यादी हा सांडपाणी दारात सोडू नका असे म्हंटले असता तु कोण सांगणार म्हणून शिविगाळ करीत काठीने फिर्यादीचे डोळ्यावर व हाताच्या पोटरीवर मारून जखमी केले. या प्रकरणी लक्ष्मण गोविंद लवकरे रा. तळेगाव यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ३५/२०२३ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवी प्रमाणे मोतीराम देशमुख यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हेडकाँस्टेबल सुग्रीव गंगाराम कोंडमंगले हे करीत आहेत.

# भाची व बहिणीला सावत्र भावाकडून मारहाण; गुन्हा दाखल

देवणी : देवणी तालुक्यातील जवळगा येथे भाच्ची व बहिणीला सावत्र भावाने मारहाण केल्या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असल्याची माहिती गुरुवार दि.१६ फेब्रुवारी रोजी देवणी पोलीसानी दिली. दि.१० फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास जवळगा येथे माहेरी आलेल्या भाच्चीला सावत्र मामाने खोटे आरोप करून सावत्र मामी व त्यांची मुलगी यांच्या चुकीच्या आरोपामुळे काठीने पायावर मांडीवर पिंडरीवर मारले बहीण सोडवण्यासाठी आली असता बहीणीस ही काठीने मारहाण केली. व शिविगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी सुप्रिया खंडू पोकले रा. जवळगा हीच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ३६/२०२३ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६,३४ भादवी प्रमाणे राजू रतन कळसे, रुक्मिणबाई राजू कळसे व सोनु सर्व रा. जवळगा यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस शिपाई देविदास ज्ञानोबा किवंडे हे करीत आहेत.

# माजी आयुक्त मच्छिंद्रनाथ देवणीकर यांना श्रध्दांजली!

देवणी : देवणी तालुक्यातील वलांडी येथे मातंग समाजाच्या वतीने मातंग समाजातील ज्ञानवंत गुणवंत आय ए एस अधिकारी तथा माजी आयुक्त मच्छिंद्रनाथ सदाशिवराव देवणीकर यांना सोमवार दि.१३ फेब्रुवारी रोजी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. माजी आयुक्त मच्छिंद्रनाथ देवणीकर यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने रविवारी रात्री निधन झाले. ही माहिती देवणी तालुक्यात धडकताच सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात आले. देवणीकर यांची कारकिर्द उपजिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी सोलापूर, जिल्हाधिकारी उस्मानाबाद, पुणे महापालिका उपआयुक्त व कृषी आयुक्त (Horticulture) महाराष्ट्र राज्य पुणे आश्या विवीध पदावर सनदी अधिकारी म्हणून कार्य केले. हे विशेष होय. वलांडी येथे झालेल्या श्रध्दांजली कार्यक्रमात प्रा. रतन सुर्यवंशी दवणहिप्परगेकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेचे आयोजिन करण्यात आले, यावेळी शिवाजी सुर्यवंशी, श्रीमंत गायकवाड, दिक्षित दवणहिप्परगा, मनोज बिरादार, शिवकुमार बिरादार, बंडु पाटील वलाडीकर, ग्रामपंचायत सदस्य, रवि सुर्यवंशी, गोकुळ दंतराव, अमोल गायकवाड, सतिश सुर्यवंशी, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, दत्ता बिरादार, पंचफुला सुर्यवंशी ,यांच्या सह देवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून...

## लग्नाचा तगादा लावताच तो...

मृत महिलेची पाहणी केली असता, सदर महिलेची अज्ञात व्यक्तीने तिच्या ओढणीने गळा आवळुन खुन करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह खाडीमध्ये ढकलुन दिला असल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले. पोलिसांनी घटनास्थळ व मृतक महिलेचा पंचनामा करून कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ६२/२०२३ भादवि कलम ३०२, २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पोलिसांनी तो मृतदेह पोस्टमोर्टमसाठी नवी मुंबई पालिकेच्या रुग्णालयात रवाना केला. कोपरखैरणे पोलिसांबरोबर या गुन्हयाचा समांतर तपास नवी मुंबई मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व पथकाने सुरू केला. मृतक महिलेची अध्यापही ओळख पटलेली नव्हती. त्यामुळे संपुर्ण महाराष्ट्र मधील पोलीस ठाणेमध्ये या गुन्हयातील वर्णनाची महिला मिसींगबाबत चौकशी करीत होते. ही चौकशी सुरू असताना, मुंबई पोलीस आयुक्तालयातील ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे मोठे मनुष्य मिसिंग क्र. २१/२०२३ मधील नोंद असलेली महिला हिचे वर्णन व नमुद गुन्हयातील मयत महिलेचे वर्णनामध्ये साम्य असल्याचे आढळून आले. या माहितीची शहानिशा करण्याकरीता गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक प्रताप देसाई, पो.ह. सरफरे व कदम हे ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे गेले.तेथे जावून या गुन्ह्याची मिसिंगची तक्रार देणारे मृत महिलेचे पती मो. अकिल फकीर मोहमंद हाशमी याच्याकडे चौकशी केली. यावेळी त्याने मिसिंग मधील महिला ही त्यांची पत्नी असल्याचे सांगून तिचे नाव सायदा बानु हासमी (वय ३३) असल्याचे सांगितले. सायदा ही व्यवसायाने सफाई कामगार असून ती जुईनगर येथे काम करीत असे. आम्ही पती-पत्नी आणि दोन मुलांसह भीमनगर रहिवाशी सेवा संघ महाराष्ट्र नगर मानखुर्द मुंबई या ठिकाणी मोठया गुण्यागोविंदाने राहत होतो. ११ फेब्रुवारी रोजी सायदा ही नेहमी प्रमाणे कामावर गेली. परंतु ती घरी परत आली नाही. मी सर्वत्र तिचा शोध घेतला पण ती मिळून आली नाही. त्यामुळे मी स्वतः ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात जाऊन सायदाच्या मिसिंगची तक्रार नोंदवली. असे सायदाचा पती अकिल हाशमी याने पोलीस चौकशीत सांगितले. पोलिसांनी मृतक महिलेचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून गुन्हयाचा जलद गतीने तपास सुरू केला. तपासाची चक्र फिरवून तांत्रिक तपास करून काही संशयीत व्यक्तीचे नंबर मिळविण्यात आले. गुन्हे शाखेचे पोलिसांनी या नंबर वर कॉल करून काही लोकांची चौकशी करून त्यांना सोडून दिले. मात्र त्यामधील संशयीत मो. क्र. ९५१९०५७९९३ पोलिसांना खटकत होता. तो मोबाईल राजकुमार बबूराम पाल या वॉचमनचा होता. राजकुमार आणि मृतक सायदा हे दोघेही एकाच सोसायटीत काम करीत होते. त्यामुळे पोलिसांनी राजकुमारचा संशय आला. त्यामुळे गुन्हे शाखेच्या पथकाने राजकुमार हा राहत असलेल्या कौसीका सोसायटी रूम नंबर २९ वाशी नवी मुंबई येथून चौकशीसाठी ताब्यात घेतले.गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून त्याची कसून चौकशी करण्यात आली. तेव्हा त्याने गुन्ह्याची पुढील प्रमाणे कबुली दिली. राजकुमार बबूराम पाल (वय ४०) हा मुळचा मु. जरका खास पो. खीरी ता. कोराव जारी, इलाहाबाद, जरी बाजार उत्तरप्रदेश येथील रहिवासी असून तो नवी मुंबई येथील कौसीका सोसायटी रूम नंबर २९ वाशी या ठिकाणी राहत होता. तो जुहूनगर येथील एका सोसायटीत वॉचमन म्हणून काम करीत होता. त्याच सोसायटीत सायदा बानु हासमी ही महिला घरकाम करत होती. दोघेही एकाच ठिकाणी काम करीत असल्याने त्यांच्यात रोज बोलाचली होत असे. यातून या दोघात अनैतिक संबंध सुरू झाले. मागील दोन महिन्यापासून त्यांच्यात अनैतिक संबंध सुरू होते. रोज भेटीगाठी होत असल्याने सायदा जास्तच राजकुमारच्या आहारी गेली. तिच्या पतीला या गोष्टीची काहीच कल्पना नव्हती. ती रोज कामावर जाऊन रात्री वेळेवर घरी येत असे. त्यामुळे संशय येण्यासारखे काहीच नव्हते. परंतु सायदा आणि राजकुमारचे अनैतिक संबंध फारच पुढे गेले होते. सायदा ही दोन मुलाची आई असून ही ती राजकुमारकडे लग्नाचा तगादा लावत होती. तर तो तिला टाळत होता. यावरून या दोघात खटके उडत असत. लग्नाचा तगादा लावल्याने तिचा ससेमिरा सोडविण्याकरीता राजकुमारने सायदा हिला त्या दिवशी कोपरखैरणे येथील कांचनगंगा सोसायटीच्या समोरील नाल्यालगत, खाडीकडे जाणाऱ्या अरुंद रोडच्या डाव्या बाजूला झाडाझुडपामध्ये भेटण्यास बोलावले. त्यानुसार ती त्याला भेटायला आली. दोघेही बराच वेळ लग्नाच्या विषयावर चर्चा करत होते. सायदा हिला त्याच्या सोबत लग्न करून संसार थाटायचा होता. तशी स्वने ती रंगवू लागली. परंतु राजकुमार याला तिच्याशी लग्न करायचे नव्हते. यावरून त्या दोघात कडाक्याचे भांडण झाले. राजकुमारला तिच्याशी लग्न करायचे नसल्याने तो आधीच बेत पक्का करून आला होता. ही माझा पिच्छा सोडणार नाही हे लक्षात आल्यावर राजकुमारने तिचा ओळणीने गळा आवळून तिची हत्या केली. आणि तो घटनास्थळहुन पळून गेला. अशी धक्कादायक कबूली राजकुमार पाल याने पोलिसांजवळ दिली. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी राजकुमार पाल याला ४८ तासाच्या आत अटक करून हा गुन्हा उघडकीस आणला आहे. ही कारवाई नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त संजय मोहिते, अपर पोलीस आयुक्त गुन्हे महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त अमित काळे व सहाय्यक पोलीस आयुक्त विनायक वस्त, गुन्हेशाखा यांच्या मार्गदर्शनाखाली, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेने वपोनि विश्वनाथ कोळेकर, पोउपनि. प्रताप देसाई, पो. हवा. आतिश कदम, पो. हवा. सतिश सरफरे, पो. हवा. महेश पाटील, पो. हवा. अनिल यादव यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

## २५ हजारांसाठी नोकर विश्वासघातकी...

राहत असल्याने त्याला त्याची पुर्ण आर्थिक परिस्थीती माहिती होती. गोव्यात देखील डॉक्टरांचे आवक जावक बऱ्यापैकी असल्याने त्याची आर्थिक परिस्थीती सधन होती. त्यांच्याकडे कायम लाख भर रूपयाची रक्कम शिल्लक असते याची माहिती सीमाचंलला होती. त्याच्याकडील पैसे बघून त्याची मती फिरली होती. कधी एकदा डॉक्टरांच्या पैशावर डल्ला मारतो असे त्याला झाले होते. डॉक्टराच्याकडे पैसे मागितले तर त्यांनी त्याला पैसे दिले नसते याची जाणीव सीमाचंल याला होती. मागे एकदा त्याने डॉक्टरांच्याकडे २५ हजार रूपये मागितले होते पण त्यांनी त्याला त्यावेळी ती रक्कम दिली नव्हती. त्यामुळे याचा राग सीमाचंल याला आला होता. डॉक्टरांनी त्याला पैसे दिले नसले तरी तो त्याचेकडे स्वयंपाकी म्हणून काम करणे बंद केले नव्हते. तो डॉक्टरांना चांगला ओळखून होता. पैसे दिले नाहीत म्हणून त्याला त्याचा राग हा होताच. डॉक्टराच्या कडील पैसे कसे मिळवायचे याचा तो विचार करीत होता. डॉक्टर सरळ मार्गानी पैसे देणार नाहीत याची त्यांना कल्पना होती. त्याने आता याचा वेगळाचा विचार केला होता. डॉक्टरांनी जर पैसे देण्यास नकार दिला तर त्याना सरळ मारून टाकयाचे आणि आपण राजस्थानला आपल्या गावी निघून जायचे असा विचार त्याने केला. या कामासाठी त्याने आपल्या दोन मित्रांची मदत घेण्याचे ठरविले. त्याच्या मित्रांनी त्याला याकामी मदत करण्यास तयारी दर्शवली. कारण डॉक्टरांच्याकडून मिळालेली रक्कमेतील वाटा तो त्यांना देण्यास तयार झाला होता. सीमाचंल याने याकामी आपले मित्र नागेंद्र कुमार आणि अलोक सिंग यानां तयार केले.या तिघांनी मिळून डॉक्टरांना मारून त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची आणि आपण पुढे काय करायचे याचा प्लॅन केला. डॉक्टरांची दिनचर्या सीमाचंलला माहित होती. घटनेच्या दोन तीन दिवस आगोदर डॉक्टर कामाला गेले नव्हते. दोन तीन दिवस अगोदर कामाला दवाखान्यात गेले नव्हते. ते घरीच आराम करीत होते. याची कल्पना सीमाचंल याला होती. त्यांना मारण्यासाठी यासारखी दुसरी संधी कोणतीही नाही हे तो ओळखून होता म्हणून त्याने या संधीचे सोने करण्यासाठी आपले मित्र अलोक सिंग आणि नागेंद्र कुमार यांना बोलावून सांगितले. त्यांनी केलेल्यां प्लॅनप्रमाणे सोमवार दि.६ फेब्रुवारी रोजी रात्री डॉक्टर झोपले असताना त्याने त्याच्या रुममध्ये आपल्या दोघा मित्रांना बोलावून घेतले. त्यावेळी रात्रीचे ११ वाजून गेले होते. डॉक्टरांना गाढ झोप लागली होती. अलोक सिंग आणि नागेंद्र कुमार हे दोघे झोपलेल्या डॉक्टराच्याजवळ गेले. त्या दोघांनी डॉक्टरांचे हात पाय दाबून धरले. तर सीमाचंल याने त्याचा गळा जोरात आवळयाला सुरूवात केली.तसे डॉक्टरांना जाग आली. समोर सीमाचंल आणि त्याच्या दोन मित्रांना बघून ते त्याच्या तावडीतून निटण्याचा प्रयत्न करीत ओरडू लागले होते.त्यावेळी रागाच्या भरात असलेल्या सीमाचंल याने त्याच्या गळ्यावर आपल्या कडील चाकूने वार केले.त्यासरशी त्याच्या गळ्यातून मोठया प्रमाणात रक्ताची धार लागली. ते लगेच रक्तताच्या थारोळ्यात पडले. जागीच त्याचां मृत्यू झाला.त्याचा आपल्यां हातून खून झाल्याचे बघून ते तिघेजण घाबरून गेले. त्यात ही धाडस करून सीमाचंल याने डॉक्टरांचे कपाट उघडून पाहिले. कपाटात १ लाख रूपये शिल्लक होते. ती रक्कम सीमाचंल याने घेतली. डॉक्टरांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी म्हणून त्यांनी डॉक्टरांच्या मृतदेहाचे दोन्ही पाय एका दोरीने बांधले,आणि त्याचा मृतदेह तसाच त्याच्या बेडच्या एका कप्प्यात कोंबून घातला. रात्रीच्या सुमारास कोणाला काही लक्षात येण्या आगोदर त्यांनी त्याच्या रूमचा दरवाजा बाहेरून बंद केला अपार्टमेटच्या खाली येवून त्यांनी डॉक्टरांची फोर्ड कार क्रमांक एम. एच. १४ सीसी २९८५ घेतली. त्यातून ते तिघेजण पळून गेले. मंगळवार असाच गेला. शेजाऱ्यांना ही डॉक्टरांच्या घरात काय घडले आहे याची कल्पना नव्हती. बुधवार सकाळी डॉक्टरांच्या रूममधून दुर्गंधी येवू लागली त्याना जास्तच दुर्गंधी येवू लागल्यावर त्यांनी या घटनेची माहिती त्यांनी दक्षिण गोवा पोलीसांना दिली. दक्षिण गोवा पोलीसांनी घटनास्थळी धाव घेवून घटनेची पाहणी करून घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. डॉ.निर्वाण भारत याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा पोलीस तपास करीत असताना पोलीसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही तपासले. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात घटनेच्या रात्री डॉ.निर्वाण भारत यांचा स्वयंपाकी सीमाचल आणि इतर दोघे जण एका कारमधून जात असल्याचे दिसत होते. घटनास्थळी पोलीस अधिक्षक अभिषेक धानिया आणि पोलीस उपाधिक्षक संतोष देसाई यांनी भेट देवून घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या सुचना दिल्या. घटनेच्या दिवसापासून मयत डॉ.निर्वाण भारत याचा स्वयंपाकी सीमाचंल परिंदा हा बेपत्ता असल्याने पोलीसांचा त्याचेवर संशय बळावला होता. तसेच डॉक्टरांची फोर्ड कार ही नव्हती. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या घरातील कपाट ही उघडे पडल्याचे दिसत होते तर कपाटातील कपडे ही अस्तावस्त पडले होते. यावरून पोलीसांनी ही घटना चोरीच्या उद्देशाने घडली असावी असा अंदाज बांधला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना सीमाचल हा डॉक्टरांची कार घेऊन मुंबईमार्ग राजस्थानच्या दिशेने जात असल्याचे कळाले. पोलीसांचे एक पथक त्याच्या मार्गावर होते.हे तिघे ही तोपर्यत राजस्थानला पोहचले होते. दक्षिण गोवा पोलीसांनी राजस्थान मधील भिलवाडा गाठून स्थानिक पोलीसांच्या मदतीने सीमाचंल परिंदा आणि त्याचे मित्र अलोक सिंग व नागेंद्र कुमार यांना ताब्यात घेतले आणि गोव्याला घेऊन आले. पोलीसांनी त्याच्याकडे डॉ.निर्वाण भारत याच्या खूना विषयी चौकशी केली असता अलोक सिंग आणि नागेंद्र कुमार यांनी सीमाचंल परिंदा याच्या सांगण्यावरून आपण डॉक्टराचा खूनात सहभागी झाल्याचे सांगितले. तर सीमाचंल याने ही पैशाच्या कारणातून आपण डॉक्टरांचा खून केल्याचे सांगितले. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी या घटनेत स्वत: फिर्यादी होऊन गुन्हा दाखल केला. डॉ.निर्वाण भारत (वय २७) याच्या खून प्रकरणी त्याचा स्वयंपाकी सीमाचंल परिंदा (वय २०), अलोक सिंग (वय १९) आणि नागेंद्र कुमार (वय २१) या तिघांच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून डॉक्टरांची फोर्ड कार जप्त केली. या घटनेचा पुढील तपास दक्षिण गोवा पोलीस अधिक्षक संतोष देसाई याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी.थेरेन डिकॉस्ता, उपनिरीक्षक सुभाष गावकर, अजित वेळीप आणि हेड कॉ.रोहन नाईक यांनी केला. पैशासाठी कोण कोणत्या थराला जाईल आणि त्यातून कोणती घटना घडेल हे काही सांगता येत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून...

## कमी कालावधीच्या अभ्यासक्रम ...

महत्वपूर्ण केंद्र ठरेल. आज जिल्ह्यात ५ ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या स्किल सेंटर्सचा जिल्ह्यातील युवक-युवतींना मोठा लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**रोजगार मेळाव्यात २ हजार ९९६ उमेदवारांचा सहभाग**

पालघर येथे आयोजित करण्यात आलेल्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचाही मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते आज सकाळी प्रारंभ करण्यात आला. या मेळाव्यात विविध ५२ कंपन्या, उद्योग यांनी सहभागी होत त्यांच्याकडील ४ हजार १९८ रिक्त जागा भरतीकरिता उपलब्ध केल्या होत्या. मेळाव्यात २ हजार ९९६ उमेदवारांनी यामध्ये सहभाग घेतला. त्यातील ८०६ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली तर विविध कंपन्यांनी ४०० उमेदवारांची अंतिम निवड केली. यावेळी खासदार राजेंद्र गावीत, पालघर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष डॉ.उज्वला काळे स्थानिक पदाधिकारी पंकज कोरे, संदीप पावडे, वेलजी गोगरी, संतोष जनाते, भूषण मर्दे, नंदकुमार पाटील, अधिकारी धनाजी तोरस्कर, सुनिल शिंदे, सहसंचालक किशोर खटावकर, मेळाव्याचे समन्वयक प्रदीप दुर्गे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी दयानंद सिडाम, कौशल्य विकासचे अधिकारी शालीक पवार, संध्या साळुंखे आदी मान्यवर उपस्थित होते.

## वसई तालुका उपनिबंधक पदी ...

याचकाळात त्यांनी खाजगी सावकारांविरोधात एक विशेष मोहीम उघडून अनेकांवर गुन्हे ही दाखल केले होते. कोरोनामुळे लांबलेल्या १७०० सहकारी संस्थांच्या निवडणुकीचे उत्तम नियोजन त्यांनी पूर्ण केले. शिंदे यांनी त्यांच्या कारकिर्दीत ६२ खाजगी सावकारांवर धाडी टाकल्या असून यापैकी १६ जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत, तर साडेतीन एकर जमीन व दोन चार चाकी गाड्या सावकरांकडून संबंधितांना परत ही केल्याचा इतिहास आहे. तसेच ते शेतकरी संघाचे प्रशासक म्हणूनही त्यांनी उत्तम काम केल् आहे. विशेष म्हणजे मागील अडीच वर्षात त्यांच्याविषयी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे एकही तक्रार नाही अर्थात कोल्हापूर जिल्ह्यात ऊत्तम कामकाजाची पार्श्वभूमी असल्यानेच त्यांना शासनाने सहकाराचा तालुका म्हणुन वसईत धाडले आहे. किंबहुना ते या वसईत आपला ठसा कसा उमटवतात हे पाहणे आव्हानात्मक असेल. सातारा, बीड आणि कोल्हापुर व आता मुंबई जवळील पालघर जिल्ह्यासारख्या सहकाराच्या वसई तालुक्यात माझ्या सहकारातील खऱ्या कारकिर्दीस सुरवात झाल्याने मला आनंद वाटतो. तक्रारींचे प्रमाण खूप असले तरी तुलनेत उपलब्ध कर्मचारी -अधिकारी वर्ग हि कमी आहेत, तरी हि नागरिकांच्या मुख्य तक्रारीलाच हात घालून शेवटी सामोपचाराने प्रश्न व तक्रारी सुटण्यास अधिक प्राधान्य देऊ,पतसंस्था व हौसिंगच्या सूचना वजा तक्रारी बाबत बारीक लक्ष देऊ, सहकाराचा तालुका असल्याने नागरिकांप्रती सहकाराच्या भावनांची जपणूक पाळली जाईल तसा विश्वास निर्माण केला जाईल, असे वसई तालुका सहकारी संस्थेचे वसई उपनिबंधक अमर शिंदे यांनी सांगितले.

## तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या...

मिळाल्यावर आरोपी नवीन बिस्ट याचे लोकेशन ट्रेस केले. तो सुरत येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. खाजगी वाहनाने एक पथक सुरतला पोहचून आरोपी नेपाळला विमानाने पळून जाण्याच्या तयारीत असताना विमानतळावरील सुरक्षा अधिकारी यांची मदत घेऊन विशेष पास घेऊन विमानतळावर प्रवेश करून आरोपीला ताब्यात घेण्यात यश मिळाले. त्याच्या ताब्यातून गुन्ह्यात चोरी केलेली रोख रक्कम ५ लाख ६५ हजार रुपये हस्तगत करत दीड लाख रुपयांचा आयफोन आणि कपडे जप्त केले आहेत.

## घरकुल योजनेसाठी लागणारी कागदपत्रे ...

ती घराखालील जागा व कुंपनाच्या आतील जमीन या गोरगरीब कुटूबीयांच्या नावे करण्यात यावी तसेच घरकुल योजनेसाठी लागणारी कागदपत्रे शिथील करावीत अशी आमची मागणी असून, त्याचा विचार होवुन योग्य ती कार्यवाही व्हावी अशी मागणी वाडा नगरपंचायतचे मुख्याधिकारी तथा तहसिलदार उद्धव कदम यांच्याकडे निवेदनाव्दारे केली त्यावेळी निवेदन देताना आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व शहरातील भुमिहीन कुटूंबे उपस्थित होते.

## सनदी अधिकाऱ्यांना निर्णय राखुन ठेवण्याचा कोणताही अधिकार नाही!

# सोलापूर महापालिका आयुक्त करत आहेत कायद्याचा भंग



**सोलापूर/प्रतिनिधी**

द सेंट्रल सिव्हिल सर्व्हिस कंडक्ट रुल्स १९६४च्या नियमां प्रमाणे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या कामकाज आणि वर्तवणुकी विषयी स्पष्ट नियम आणि कायदे अधोरेखित करण्यात आले आहे. सदर नियमांत वेळोवेळी जनतेला सुसह्य होईल असे बदल करण्यात आले आहेत. सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी त्यांच्या पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर सिध्देश्वर सह साखर कारखान्याची को जनरेशन विषयी ४७८ नोटीसअंतर्गत कारवाई करण्या संबंधी सुनावणी घेतली होती ज्यास आज दोन महिन्याहून अधिकचा कालावधी लोटला आहे. द सेंट्रल सिव्हिल सर्व्हिस कंडक्ट रुल्स १९६४ आणि महाराष्ट्र सिव्हिल सर्व्हिस कंडक्ट रुल्स १९७९ च्या कायद्यानुसार नागरी प्रश्नां विषयी निर्णय घेण्यास ३० दिवसापेक्षा अधिकचा कालावधी घेता येऊ शकत नाही, जर जसे झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर ह्या कायदा कलमानुसार तात्काळ कारवाई करण्याचे अधिकार वरिष्ठ अधिकार्यांना दिले आहे. आठवड्यातून फक्त एकदाच भेटण्याचा कोणताही नियम कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांना लागु नसुन सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या वतीने फक्त सोमवारी भेटण्याचे नियोजन हे बेकायदेशीर असल्याचे विविध कायदा कलमांखाली स्पष्ट होत आहे. सोलापूर महापालिकेच्या वतीने होणाऱ्या जाणिवपुर्वक दफ्तर दिरंगाईबद्दल आणि प्रशासकीय राजवटीच्या हुकूमशाही बद्दल सोलापूर विकास मंचच्या वतीने केंद्रीय नगरविकास आयोग, महाराष्ट्र राज्याचे नगरविकास विभाग आणि विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सोलापूर विकास मंचच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली आहे. होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूरकरांच्या तीव्र भावना वेळोवेळी प्रशासना पोहचुनही प्रशासनाच्या वतीने जाणिवपुर्वक अडथळा निर्माण करुन होणाऱ्या दफ्तर दिरंगाईबद्दल सोलापूरकरांच्या मनात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. निवेदन देताना विकास मंच चे केतनभाई शहा, प्रमोद शहा वकील, योगीन गुज्जर, गणेश पेनगोंडा, अंबुरे वकील, विजय कुंदन जाधव आदी उपस्थित होते.

## भिवंडीत फायबर साहित्याला भीषण आग



**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी तालुक्यातील बोरपाडा येथील मोकळ्या जागेत असलेल्या सुक्या गवताला लागलेली आग पेटत पेटत एका फायबर गोदामांपर्यंत पोहचल्याने फायबर गोदाम आगीत जळून खाक झाल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी बोरपाडा परिसरात घडली आहे. हि आग एवढी भयानक होती की आगीत डेको आहे रेशनसाठी लागणारे फायबरचे साचे व साहित्य जाळून खाक झाले असून परिसरात धुराचे लोटच्या लोट हवेत पसरले होते. तर जवळच पेट्रोल पंप असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या आगीची माहिती अग्निशमन दलास उशिरा मिळाल्याने आग मोठ्या प्रमाणात भडकली होती. दरम्यान घटनास्थळी अग्निशामक दलाच्या दोन गाड्या दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळविले असून आगीत संपूर्ण फायबर साहित्य जळून खाक झाले होते. यात लाखोचे नुकसान झाले आहे.

## नालासोपाऱ्यात समाजसेवेचा अनोखा 'व्हॅलेंटाईन डे'



नालासोपारा : 'युवा संघर्ष विद्यार्थी संघटने'तर्फ दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही १४ फेब्रुवारी रोजी रस्त्यावरील निराधार लोकांना जेवण वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी वसई-विरार क्षेत्रात बस स्थानक, रेल्वे स्थानकानजीकच्या परिसरात ४०० जेवणाचे कँटेनर, ४०० पॉकेट बिस्कीट, ४०० पाण्याच्या बॉटल गरजूनां देण्यात आल्या. या कार्यक्रमात वसई-विरार विभागातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या रासेयो स्वयंसेवकांनी ही सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाला किशन सुरेश सहानी, स्मित गायकवाड, अभिषेक घाटगे, सौरभ पाटील, अक्षय सुभाणे, शुभम शिंदे, प्रथमेश पाटोळे, राहुल मराठे, अथर्व साळसकर हे विद्यार्थी उपस्थित होते. तसेच सचिन पिसे, डॉ.दीपा कत्रे, वैशाली वानखेडे, अदिती यादव, देविका गावंड हे शिक्षकवर्गासह रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शत्रुघ्न फड, तसेच वर्तक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## पंचशील ट्रस्ट ओरस यांच्या मार्फत मुंबई येथे बौद्ध वधू वर परिचय मेळावा

मुंबई : पंचशील ट्रस्ट ओरस आदर्श नगर यांच्या वतीने जुळून येती रेशीम गाठी या माध्यमातून बौध्द वधूवर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे २५-२-२०२३ रोजी सोशल सर्व्हिस लीग हायस्कूल दामोदर हॉल कंपाऊंड परेल मुंबई येथे सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. तरी बौद्ध समाजातील मुलामुलींनी तसेच पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पूज्य भन्ते काश्यप अंबरनाथ पत्रकार सोनू जाधव, प्रा.वैभव कदम, वासुदेव तांबे, कमलेश कदम, आरती कदम, अमर जाधव, वृंदा, पेंडुरकर, आनंद मिठबावकर,महेंद्र जाधव, संयोगिता कदम, सविता नाईक, अशोक नाईक पंचशील ट्रस्ट अध्यक्ष गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त व समाज भूषण प्राप्त आयु. संजय बळवंत खोटले कर, त्याच प्रमाणे पंचशील ग्रुपचे सर्व पदाधिकारी व सभासद उपस्थित राहणार आहेत. तरी या मेळाव्याचा सर्वांनी लाभ घ्यावा व आपला जोडीदार निवडावा अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

## शरद पवार आणि अमित शहांच्या संवादातूनराज्यातील सहकार चळवळीला दिशा मिळेल -आम. प्रविण दरेकर

**पुणे/प्रतिनिधी**



'सकाळ' माध्यम समुहातर्फे पुण्यात बँकिंग व साखर उद्योगासाठी दोन दिवसीय 'सहकार महापरिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. आज या महापरिषदेचे उदघाटन माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकरही उपस्थित होते. या महापरिषदेत बोलताना आमदार प्रविण दरेकर यांनी शरद पवार आणि अमित शाह या दोन नेत्यांच्या संवादातून महाराष्ट्रातील सहकार चळवळीला दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच सहकार चळवळीतील लोकांनी एकत्रित येऊन या चळवळीच्या उत्कर्षासाठी प्रयत्न केला पाहिजे, असे आवाहनही केले. दरम्यान, या महपरिषदेचा समारोप केंद्रीय गृहमंत्री आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, सामाजिक कृषीबरोबर सहकार क्षेत्राला व्यासपीठ दिल्याबद्दल सकाळच अभिनंदन. सहकार क्षेत्रात अनेक अडचणी आहेत. महाराष्ट्राच्या विकासात सहकाराचे मोठे योगदान आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था ज्यावर उभी आहे त्यात सहकाराचे मोठे स्थान आहे. आज सहकारी, जिल्हा बँकांसमोर अनेक अडचणी आहेत. राज्यातील साडेचारशे, पावणे पाचशेच्या आतमध्ये बँका आहेत. परंतु बऱ्याच बँका अडचणीत आहेत. डबघाईला आल्या आहेत. एनपीए वाढला की आमच्यावर कारवाई सुरु होते. परंतु एखाद्या उद्योगपतीने एक-दोन हजार कोटीचे कर्ज थकवले तर मोठ्या बँकेने बजेटमध्ये प्रोव्हिजन करून एनपीएची तरतूद केली जाते. परंतु अर्बन को-ऑप.बँका, आमच्या छोट्या बँका एक-दोन लाखांचे गरिबांचे कर्ज थकलं तर राज्याच्या बजेटमध्ये अशा प्रकारची कुठलीच तरतूद नाही. हा विषय विधिमंडळात मी मांडला. त्याचा पाठपुरावाही करतोय. आम्ही अर्बन को-ऑप. बँकांमधून, जिल्हा बँकांतून स्वतःचा राज्य सहकारी बँकेने एकत्रितपणे फंडही उभा करू. ज्या अडचणीत बँका असतात त्यांना आम्ही काही निधी उभा करु, काही शासनाने निधी द्यावा, जर प्रारंभीक टप्प्यात त्या अडचणीत आहेत तेव्हा दोन-पाच कोटीची मदत केली तर बुडणाऱ्या बँका सर्वायू होऊ शकतात. नंतर त्या सुस्थितीत आल्यावर पुन्हा पैसे परतफेड करू शकतात अशा प्रकारची यंत्रणा करण्याची गरज आहे. कारण राज्यात जवळपास सहकारी चळवळीतील ५० टक्क्याहून अधिक बँका महाराष्ट्रातील आहेत. देशाच्या सहकार चळवळीचा मोठा भाग महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. म्हणून अलीकडच्या काळात वेगवेगळ्या क्षेत्रातील संस्था कमी होताहेत. आर्थिक उलाढाल कमी होतेय. काही निवडक बँका आपल्या क्षमतेवर, मेहनतीवर पुढे जाताहेत, असेही दरेकर म्हणाले.

## थोडक्यात वृत्तांत



### भोकरपाडा येथे मुलांच्या वसतिगृहाचे उद्‌घाटन

वाडा : वाडा तालुक्यातील उज्जैनी सारख्या अतिदुर्गम भागातील गरजवंत विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण घेत असताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याच्या उद्देशाने स्माईल फाउंडेशनच्या वतीने मुलांसाठी वसतिगृहाची उभारणी केली असून उद्‌घाटन करण्यात आले. उज्जैनी गावाच्या हद्दीतील भोकरपाडा येथे या वसतिगृहाचे उद्धाटन जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पार्वती महाले (आई) यांच्या हस्ते संपन्न झाले या प्रसंगी स्माईल फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रियांका महाले, राजू महाले, भगवंत मोरे, सतिष कांबळे, सरोज कांबळे, चंद्रकला मोरे, प्रकाश लहांगे, महेश कोटी, शरद लहांगे, संस्थेचे सभासद, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.



### सेवालाल महाराजांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक

देवणी : देवणी शहरात शुरवीर सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुधवार दि.१५ फेब्रुवारी रोजी धनगर गल्ली ते पंचायत समिती दरम्यान भव्य मिरवणूक काढण्यात आली. देवणी शहरात शुरवीर सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत बजारा समाजातील महिला पुरुष मोठ्या उपस्थित होते, पारंपारिक पध्दतीने नृत्य कला गुणांचा सादरीकरण करण्यात आला. यावेळी शिवाजी राठोड, रवि राठोड, देविदास राठोड, नामदेव चव्हाण, अंकुश राठोड, नामदेव पवार, बाळु पवार, उत्तम पवार, संतोष राठोड, संजय राठोड, यांच्यासह बंजारा समाजातील महिला पुरुष युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते, या मिरवणुकीसाठी देवणी पोलीसांच्या वतीने तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




### चिमुकल्यांची शिवजयंती उत्साहात साजरी

वाडा : छत्रपती शिवाजी महाराज जयंती किंवा शिवजयंती हा महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध सण व उत्सव आहे. हा सण मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त महाराष्ट्र सरकारने निश्चित केल्याप्रमाणे हा सण महाराष्ट्रभर मोठ्या आनंद व उत्साहात साजरा केला जातो. वाडा शहरातील खंडेश्वरी नाका येथील एड्यूस्मार्ट डिजिटल स्कूलच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सवात खंडेश्वरी नाका येथे शिववंदन करून लेझिम नृत्यच्या तालावर नाचून शिवजयंती साजरी केली.

# अहमदनगर येथे पैसे हडपण्यासाठी भाच्याने लावली मामाची वाट

**अहमदनगर/क्राईम रिपोर्टर**

प्रदीप मेहेत्रे हा पुणे येथील एका कंपनीत डिलीव्हरीचे काम करत होता. अहमदनगर जिल्ह्याच्या राहुरी तालुक्यातील केसापूर येथे त्याचा मामा राहतो. ट्रांन्स्पोर्टचा व्यवसाय असलेल्या या मामाचा प्रदिप मेहेत्रे हा चुलत भाचा आहे. प्रदीपने या मामाकडून प्रत्येक वेळी विविध कारणे सांगून दोन लाख रुपये उसने घेतले. हे पैसे परत करण्याचे तो नावच घेत नव्हता, उलट आपल्याला मामाने आणखी लाख रूपये द्यावेत अशी त्याची अपेक्षा होती. पण मामाने दिलेल्या पैशासाठी भाचा प्रदिपकडे तगादा लावण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे भाचा प्रदीप नाराज झाला होता. आपल्या मामाकडे भरपूर पैसे आहेत, त्याने त्यातले थोडे आपल्याला दिले तर काय फरक पडणार आहे असे प्रदीपला वाटत होते. पण मामाने जे कमवले होते, त्यामागे मोठी मेहनत होती. दिवस-रात्र राबून ते आर्थिक संपन्न झाले होते. समाजात मानसन्मान मिळवला होता. गरीब भाचा म्हणून त्यांनी मदत केली होती. पण त्याला त्याची जाणिव नव्हती. त्यांनी केलेल्या मदतीचा गैरफायदा घेत त्यांना फसवण्याचाच उद्योग तो करत होता, त्यामुळे मामा पैसे परत मागू लागले होते. तसेच त्यांनाही कामासाठी पैशाची गरज भासू लागल्याने तो प्रदीपकडे पैसे परत दे असा तगादाच लावला. याचा प्रदीपला राग आला, मामाला अद्दल घडवली पाहिजे असे कुविचार त्याच्या मनात येऊ लागले. मामाकडून आणखी पैसे उकळण्यासाठी त्याने एक कारस्थान केले.

प्रदीप पुण्यामध्ये एका कंपनीत डिलीव्हरी बॉय म्हणून काम करत असतांना त्याची ओळख एका तरुणीसोबत झाली होती. रत्नागिरी जिल्ह्यातील शिरगाव येथील रहिवासी असलेली ती तरुणी उदरनिर्वाहासाठी पुण्याला आली होती. तिच्या माध्यमातून मामाला धडा शिकवण्याचे प्रदीपने ठरवले. तिच्या माध्यमातून त्याने मामावर जाळे टाकण्यास सुरुवात केली. त्याने तिला मामाचा मोबाईल क्रमांक दिला. केसापूर येथील प्रदीपच्या मामाचा ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय चांगला सुरु होता. ४ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास ते त्यांच्या कार्यालयात बसले होते. त्याचवेळी त्यांच्या मोबाईलवर एका अनोळखी मुलीचा फोन आला. तिने मामाला नमस्कार करून 'तुमच्या मेहेते नावाच्या मित्राने तुमचा मोबाईल नंबर दिला आहे. तुम्हाला क्रेडीट कार्ड पाहिजे का?' अशी विचारणा केली. मामाने तिला 'मला क्रेडीट कार्डची गरज नाही' असे सांगितले. ती म्हणाली, 'बँकेची क्रेडीट कार्डसाठी ऑफर चालू आहे, मी तुम्हाला ते ऑफरमध्ये देते. हे ऐकून व्यावसायीक मामाला वाटले काही ऑफर मिळत असेल तर घ्यावे, पुढे काय करायचे ते बघता येईल. त्याने होकार दिला. मग तिने त्याच्याकडून आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर आवश्यक माहिती व्हॉटसअॅपद्वारे पाठवण्यास सांगितले. मामाने सगळी माहिती तिने दिलेल्या व्हॉटसअॅप क्रमांकावर दिली. तो नंबर मामाकडे सेव्ह झाला. दुसऱ्या दिवशी त्या नंबरवरून मामाला मॅसेज आला. मामाने रिप्लाय दिला. गुड मॉर्निंग, गुड नाईट करता करता इतर गप्पाही होऊ लागल्या. रिकाम्या वेळेत तोही टाईमपास करू लागला. ती तर नेहमीच फ्री असायची. मामाने मॅसेज केला की ती लगेच रिप्लाय द्यायची. मामाला तिची जणू भूलच पडली होती. प्रदीपचे मामा व तिची चांगली ओळख झाली. आता ते एकमेकाला अधून-मधून फोन करू लागले होते. गप्पा मारू लागले होते.

काही दिवस गेल्यानंतर तिने प्रदीपच्या मामाला फोन केला. ती त्याला म्हणाली की, 'मला माझ्या गावी जायचे आहे. तुम्ही मला १५ हजार रूपये द्या. मी तुम्हाला पैसे परत करेन.' तिच्यावर विश्वास ठेवत तिला दि. ११ नोव्हेंबर २०२२ रोजी फोनपे द्वारे ७ हजार रूपये व दि. १६ नोव्हेंबर २०२२ रोजी गुगल पे द्वारे दहा हजार रूपये असे एकूण सतरा हजार रूपये दिले. काही दिवस गेल्यानंतर त्या मामाने डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मामाने तिच्याकडे दिलेले सतरा हजार रुपये परत मागण्यासाठी मोबाईलवरुन संपर्क केला. तेव्हा ती म्हणाली की, 'तुम्ही पुण्याला आल्यावर मी तुम्हाला तुमच्याकडून घेतलेले पैसे देईन किंवा मी शिर्डी येथे आल्यावर पैसे देईन ती असे म्हणाल्याने मामाने पैशांचा विषय काही दिवस बाजूला ठेवला. दरम्यान दि. १७ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी नऊ वाजता त्या तरुणीने प्रदीपच्या मामाला फोन करून कळवले की, 'मी शिर्डी येथे दर्शनासाठी येत आहे. तेथे आल्यावर मी तुम्हाला पैसे देईन.' त्यानंतर त्याच दिवशी सहा वाजण्याच्या सुमारास त्या तरुणीने पुन्हा त्याला कॉल करून सांगितले की मी कोल्हार खुर्द येथील लॉजींगवर आलेली आहे. तुम्ही येथे येवून तुमचे पैसे घेवून जा'. तिचे बोलणे ऐकून तो विचारात पडला. त्याला तिच्याकडून १७ हजार रूपये घ्यायचे होते, त्यामुळे तिला भेटायला गेलेले बरे असे त्याला वाटू लागले. काही मिनिटातच तिने सांगितलेल्या लॉजींगवर मामाने आगमन केले. ती तरुणी रत्नागिरी जिल्ह्यातील असल्याचे रिसेप्शन काऊंटरवर असलेल्या तिच्या आधार कार्डवरून मामाला समजले. त्या तरुणीने प्रदीपच्या मामाला लॉजवरील रूमवर नेले. रूममध्ये जायचे, पैसे घ्यायचे आणि निघायचे असा त्याचा सरळ विचार होता, पण खोलीत गेल्यानंतर तिने प्रसादाचा पुडा उचलला आणि त्याला प्रसाद दिला. प्रसाद म्हटल्यावर त्याला नाही म्हणता आले नाही. त्याने प्रसाद खाल्ला. ती त्याच्याबरोबर गप्पा मारत होती, त्यामुळे तोही थांबला. काही वेळाने त्याला गरगरल्यासारखे होऊ लागले, तेंव्हा तिने त्याला बेडवर बसवले. ती अगदी त्याच्याजवळ बसली होती. त्याच्याशी प्रेमाने बोलत तिने त्याला ड्रिंक दिले आणि आपणही घेतले. ती पिते म्हटल्यावर त्याला नकार देणे कठीण वाटले. इथेच त्याची फसगत झाली. त्याने ड्रिंकचे घुटके घेतले. त्याच्यासोबत ड्रिंक घेत ती लगट करू लागली. त्याच्यावर नशेचा अंमल झाला होता. त्यातच ती लाडीकपणे चाळे करू लागल्याने त्याचे भान सुटले, त्यामुळे ती जसे सांगेल तसे तो करत होता. तिने सांगितले तसे त्याने त्याच्या अंगावरील कपडे काढले. तो अंडरवेअरवर बेडवर पडला होता. ती तरुणी त्याच्यासोबत रोमान्स करू लागली. पहाता पहाता दोघांच्याही अंगावरचे उरले सुरले कपडेही उतरले. दोघे पूर्ण नग्नावस्थेच चाळे करू लागले. आपण काय करत आहोत, कोणासोबत आहोत, कोणत्या कारस्थानाचे बळी ठरत आहोत याची त्याला जाणिवच नव्हती. काही क्षणातच ते दोघे एकरूप झाले. दोघात शरीरसंबंध झाले. ते कामक्रिडेत रंगले होते, तेंव्हा रूममध्ये पडद्याआड वेगळ्याच हालचाली सुरू होत्या. ते त्या तरुणीला माहित होते, पण त्या मामाला काहीच माहित नव्हते. तो नशेमध्ये होता. ती मात्र शुद्धीत राहून तिच्या जोडीदारामार्फत व्हीडीओ शुटींग करत होती. या गोष्टीची खबरदेखील त्याला नव्हती. आपला कार्यभाग आटोपल्यानंतर ती तरुणी व तिचा जोडीदार तिथून रफूचक्कर झाले. मामाला शुद्ध आली तेंव्हा तो उठून त्याच्या घरी परत आला.

दि. २० डिसेंबर २०२२ रोजी संध्याकाळी सहा वाजता त्या तरुणीने प्रदीपच्या मामाला फोन केला. ती म्हणाली, माझे तुमच्यावर प्रेम जडले आहे. तुमचे माझ्यावर प्रेम आहे की नाही?' तेंव्हा मामा गोंधळला. आपल्या हातून चूक झाली हे त्याला मान्य होते, पण ते सगळे नशेत झाले होते, त्यामुळे आता तो सावध होता. त्याने तिला नकार दिला, तेंव्हा तिने तिचे शस्त्र उपसले. 'त्यादिवशी लॉजमध्ये जे काही घडले त्याचा मी व्हीडीओ काढलेला आहे. तुम्ही जर माझ्याशी लग्न केले नाही तर मी तुमचा व्हीडीओ व्हॉटस्अॅपवर व इन्स्टाग्रामवर प्रसारीत करून तुमची बदनामी करीन. जर हे नको असेल तर तुम्ही मला ३० लाख रूपये द्या अशी थेट धमकी दिली. हे ऐकून मामाला मोठा धक्का बसला. ही बला टाळण्यासाठी व आपली बदनामी होईल या भीतीपोटी तो तिला आज पैसे देतो, उद्या देतो म्हणून टाळाटाळ करू लागला. एवढी रक्कम आणायची कुठून हा मोठाच प्रश्न होता. याशिवाय कष्टाची कमाई या भामट्यांना का द्यायची असा विचारही ते करत होते. त्यामुळे मामा पैसे देण्यास टाळाटाळ करत होता. पण ती गप् बसली नाही. तिने लॉजवरचा व्हीडीओ प्रदीपच्या मामाच्या काही मित्रांना व्हॉटसअॅप व इन्स्टाग्रामवर पाठवला. त्याचे स्क्रीनशॉट तिने प्रदिपच्या मामाला पाठवले. ही बाई चांगलीच तयारीची आहे हे त्यांच्या लक्षात आले. तिच्या या उद्योगाला घाबरून त्याने तिला दि. ३१ डिसेंबर २०२२ रोजी २१ हजार रूपये फोन पेद्वारे पाठवले. ती तरुणी वारंवार त्या मामाला फोन करून ३० लाख रूपयांची मागणी करू लागल्याने तो इज्जतीला घाबरून नैराश्यात जावू लागला. अखेर मनाचा दृढनिश्चय करून दि. २ जानेवारी २०२३ रोजी रात्री ११.५० वाजता त्या मामाने राहुरी पोलिस स्टेशनला त्या तरुणीविरुद्ध गुन्हा रजि.नं. १२/२०२३ भा.दं.वि. ३२८, ३८३, ३८५, ५०५ अन्वये गुन्हा दाखल केला. पोलिस स्टेशनला फिर्याद देतेवेळी त्याचा भाचादेखील त्यांच्यासोबत होता. तो सर्व अपडेटस त्या तरुणीला देत होता. राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मेघश्याम डांगे, उपअधिक्षक बारूदत्त खोंडे, पोलीस नाईक इफ्तिकार सय्यद यांनी तात्काळ आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. डी.वाय.एस.पी. सदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू झाला. त्या तरुणीला साथ देणारा संशयित प्रदीप मेहेत्रे याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता सहा दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली. दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली.



संशयीत प्रदीप मेहेत्रे




# कमी कालावधीच्या अभ्यासक्रम प्रशिक्षणासाठी पालघर जिल्ह्यात ५ आयटीआयमध्ये स्कील सेंटर्स सुरु

## आदिवासी उमेदवारांसाठी जव्हार येथे लवकरच कौशल्य प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्र सुरु करणार-मंगलप्रभात लोढा

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यातील पालघर, जव्हार, मोखाडा, वाणगाव व तलासरी येथील आयटीआयमध्ये विविध कमी कालावधीच्या अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणाऱ्या स्कील सेंटर्सचा आज राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. आदीवासी उमेदवारांकरीता जव्हार येथे प्रस्तावित असलेले नवीन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्र लवकरच सुरु करण्यात येईल, असे मंत्री श्री. लोढा यांनी यावेळी जाहीर केले.

पालघर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मधील स्किल सेंटरमध्ये डोमेस्टीक आयटी हेल्पडेस्क अटेन्डन्स हा कमी कालावधीचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. त्याचबरोबर जव्हार शासकीय आयटीआयमध्ये लाईट मोटर व्हेईकल ड्रायव्हर, मोखाडा शासकीय आयटीआयमध्ये इलेक्ट्रिशन टेक्निकल, वाणगाव शासकीय आयटीआयमध्ये लाईट मोटर व्हेईकल ड्रायव्हर, तलासरी शासकीय आयटीआयमध्ये डोमेस्टीक आयटी हेल्पडेस्क अटेन्डन्स हे कमी कालावधीचे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी प्रत्येक बॅचमध्ये प्रत्येकी ३० उमेदवारांना प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. आज पालघर येथील स्कील सेंटर तसेच अभ्यासक्रमाचा मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते तर इतर ठिकाणच्या सेंटरचा ऑनलाईन पद्धतीने प्रारंभ करण्यात आला.

जिल्ह्यातील आदिवासी उमेदवारांकरीता जव्हार येथे नवीन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी आवश्यक सर्व बाबींची उपलब्धता करुन देऊन लवकरच हे केंद्र सुरु करण्यात येईल, असे मंत्री श्री. लोढा यांनी यावेळी जाहीर केले. ते म्हणाले की, तरुणांना दर्जेदार कौशल्य आणि त्यानंतर खात्रीचा रोजगार मिळावा यासाठी कौशल्य विकास विभागाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. आदिवासी भागातील उमेदवारांसाठीही त्या त्या भागाच्या गरजेनुसार विविध कौशल्य प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येतील. जव्हार येथे प्रस्तावित प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्र हे त्यादृष्टीने ...पान ६ वर

# विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण करून आयुष्यात प्रगती करावी-दशरथ पाटील

**वाडा/प्रतिनिधी**




अल्पवयीन विद्यार्थ्यांनी प्रेम प्रकरणात गुंतून लग्नाची घाई करण्यापेक्षा सर्वोच्च शिक्षण घेऊन आयुष्यात प्रगती करावी लग्न तर होणारच आहे. अल्पवयी असताना लग्न करणे म्हणजे कायदा तोडणे आहे. त्याची शिक्षा तर होईलच मात्र यांचा आई वडिलांनाही त्रास होईल. असे मत पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी व्यक्त केले. ते वाडा तालुक्यातील जनसंपर्क अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रमात बोलत होते. वाडा तालुक्यातील चिंचघर येथील ह . वी. पाटील महाविद्यालयात आयोजित जनसंवाद अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रमात विदयार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक संतोष वाघचौरे, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी बाणे, ह.वी. पाटील विद्यालय शाळेचे मुख्याध्यापक संदेश पाटील, शाळेचे सहशिक्षक सुनील पाटील, चिंचघर गावचे पोलीस पाटील अनिता ठाणगे, दक्षता कमिटीचे अध्यक्ष अर्चना भोईर, शाळेचे शिक्षक तसेच कुडूस परिसरातील मान्यवरांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळींज गुन्हे प्रकटीकरण पथकाची धडाकेबाज कारवाई; आरोपी सुरत विमानतळावरून अटक



**वसई/प्रतिनिधी**

तुळीज पोलीस हाद्दीतील प्रगती नगर भागाता सात लाख रुपयांची चोरी करून नेपाळ येथे पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला सुरत विमानतळावरून तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीकडून ५ लाख ६५ हजारांची रोख रक्कम हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. प्रगती नगरच्या शिवसाई अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या सरोजा यादव (४०) यांच्या घरातून १३ फेब्रुवारीला चोरी झाली होती. त्यांच्या घरातील टेबलखालून ७ लाख रुपयांची रोख रक्कम असलेली बॅग आरोपी नवीन बिस्ट याने चोरी करून पळून गेला होता. याप्रकरणी तक्रार आल्यावर तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. सदर गुन्ह्यांची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत तुळींज पोलिसांना मार्गदर्शनपर सुचना दिल्या होत्या. गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी तांत्रिक व गुप्त माहिती ...पान ६ वर

# घरकुल योजनेसाठी लागणारी कागदपत्रे शिथिल करण्याची मागणी

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा नगरपंचायत क्षेत्रांत वडीलोपार्जित राहणाऱ्या आदिवासी-बिगर आदिवासी कुटूबियांच्या घराखालील व कुंपनाच्या आतील जमीन नावावर करणेबाबत तसेच मंजुर घरकूल योजनेमध्ये लागणारी कागदपत्रे शिथिल करणेबाबत आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेचे अध्यक्ष अनंता वनगा यांनी वाडा तहसिलदार उद्धव कदम यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी केली. वाडा नगरपंचायत क्षेत्रांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना मंजुर झाली आहे. सदर योजनेचा उद्देश हा बेघर, भुमिहिन, आर्थिक दृष्ट्या दुर्बल, विधवा महिला असणाऱ्या कुटूबियांना आपल्या हक्काचे घर मिळावे यासाठी संपूर्ण देशभरात ही योजना राबिवली जात आहे. वाडा नगरपंचायत अंतर्गत सन २०१८मध्ये घरकुल योजनेसाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यामधील १७५ लाभार्थाची यादी बनवुन मंजुरीसाठी मंत्रालयात पाठवली असल्याचे वाडा नगरपंचायत मधुन सांगण्यात आले मात्र वाडा ग्रामपंचायत असल्यापासून वाडा शहरातील सर्व नगरातील व पाड्यांची पाहणी करुन कच्च्या, कुडाच्या घरांचा सर्वे करावा व त्यामध्ये कच्चे कुडाचे, माती विट बांधकाम, भितींना तडे व पाया बांधकाम झाले असेल या पद्धतीने यादी तयार करावी असे लेखी पत्राद्वारे सुचवले असल्याची माहिती अनंता वनगा यांनी दिली. परंतू वाडा नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांनी तसे न करता सरसकट यादी बनवली १७५ पैकी किती लाभार्थी हे कच्च्या, कुडांच्या घरात राहतात हे प्रत्यक्ष पाहणे गरजेचे होते. त्यासाठी सन २०१६ ते सन २०२२ पर्यत मागणी करुन सुद्धा प्रत्यक्ष सर्वे केला गेला नाही, त्यामुळे गोरगरीब कच्च्या कुडांच्या घरात राहणारे लाभार्थी प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहेत असेही वनगा यांनी सांगितले. सदर वाडा नगरपंचायत होण्याआधी सन २००५ ते सन २०१६ पर्यत किती लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ दिला आहे व त्यांची नावे आत्ताच्या वाडा नगरपंचायत प्रधानमंत्री आवास योजनेच्या यादीमध्ये आहेत का? हे पाहणे महत्त्वाचे आहे, तसेच वाडा शहरातील आदिवासी कुटूंब व बिगर आदिवासी कुटूंबांची वडिलोपार्जित घरे असून सदरची घरांची जागा ही इतर मालकांच्या नावे असल्याने आत्ता हे जागा मालक पक्क्या घरांसाठी जागा देण्यास हरकत करीत आहेत. सदर गोरगरीब कुटूंब ही त्यांच्या वडीलोपार्जित काळापासून इतरांच्या जागेवर कच्च्या कुडाची घरे बांधून राहतात, ...पान ६ वर

# वसई तालुका उपनिबंधकपदी कोल्हापूरचे जिल्हा उपनिबंधक अमर शिंदे यांची नियुक्ती!

## योगेश देसाई यांची मुंबईत सहकारी संस्था, उपनिबंधक (मत्स्य) पदी वर्णी

**वसई/प्रतिनिधी**



मागील साडेतीन वर्षाच्या कार्यकाळा पैकी दोन वर्षे कोविडचा खडतर कार्यकाळ मात्र तो ही यशस्वीरित्या पूर्ण केलेले सहकारी संस्था, वसई तालुका उपनिबंधक योगेश देसाई यांची प्रशासकीय कारणास्तव नियमित बदली झाली असून त्यांच्या जागी आता सावकारांचे कर्दनकाळ व कोल्हापूर जिल्ह्यात उत्तम काम केलेले कोल्हापूरचे जिल्हा उपनिबंधक अमर शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोमवार दि ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी नवनियुक्त उपनिबंधक अमर शिंदे यांनी आपल्या वसई तालुका उपनिबंधक कार्यालयाचा पदभार मावळते उपनिबंधक योगेश देसाई यांच्याकडून स्वीकारला असून बदलीनंतर आता देसाई यांची मुंबईत मरीन ड्राइव्ह स्थित मुंबई सहकारी संस्था उपनिबंधक (मत्स्य) या पदावर वर्णी लागली आहे.२ फेब्रुवारी २०२३ रोजी उपनिबंधक योगेश देसाई यांच्या सहित राज्यातील १६ विविध उपनिबंधक व जिल्हा उपनिबंधक संवर्गातील गट -अ पदाच्या बदल्यांचे आदेश शासनाचे कक्ष अधिकारी अनिल चौधरी यांनी काढले होते. त्यानुसार बदलीचे आदेश मिळाल्यानंतर तात्काळ कोल्हापूर हुन थेट सोमवारी वसईत येऊन नवनियुक्त उपनिबंधक अमर शिंदे यांनी आपला पदभार स्विकारत कामकाजास सुरुवात ही केल्याची माहिती अमर शिंदे यांनी स्वतः दिली. दरम्यान उपनिबंधक शिंदे गेल्या अडीच वर्षापासून कोल्हापूर जिल्ह्यात कार्यरत होते. मूळचे जिल्हा व तालुका सातारा मधील गाव मौजे पाठखळ गावचे रहिवासी असून सुरुवातीला बीड जिल्ह्यात तालूका उपनिबंधक म्हणुन रुजू होत त्यानंतर कोल्हापूर जिल्हा उपनिबंधक म्हणून प्रभावी काम केले. ...पान ६ वर

# आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणार -डॉ.विजयकुमार गावित



**पालघर/प्रतिनिधी**

शासनाच्या विविध विकास योजनेच्या माध्यमातून आदिवासी समाजाचा सर्वांगीन विकास करून आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी सांगितले. जव्हार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यांच्या मार्फत विविध योजनेच्या लाभार्थी यांना साहित्य, व धनादेश श्री. गावित यांच्या हस्ते वाटप करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. या वेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वनगा, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, सहाय्यक जिल्हाधिकारी आयुषी सिंह तसेच वरिष्ठ अधिकारी व आदिवासी बांधव उपस्थित होते. आदिवासी बांधवाना घरकुल योजनेअंतर्गत घरकुल देण्यात येणार जिल्ह्यात शंभर टक्के घरकुलाचे उद्दिष्ट पूर्ण करणार जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक घराला नळाद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येणार जिल्ह्यातील शंभर टक्के घरांना विज जोडणी करण्यात येणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले. शासकीय आश्रम शाळा आणि वस्तीगृहामध्ये शासनामार्फत दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून आदिवासी बांधवांनी आपल्या मुलांना शासकीय आश्रम शाळा तसेच वस्तीगृहामध्ये प्रवेश दयावा. आदिवासी बांधवाचे स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक पातळीवर मुबलक प्रमाणात उपलब्ध होणारे फळ व वनौषधी व इतर वनस्पती प्रक्रिया उद्योगांना चालना देणार आदिवासी पाड्यावरील रस्ते मुख्य रस्त्याशी जोडणार यामुळे दळणवळणा मध्ये वाढ होऊन उद्योगधंद्यांना चालना मिळणार असल्याचा विश्वास डॉ.गावित यांनी व्यक्त केला. आदिवासी बांधवांना आदिवासी विभागा बाबत कोणतीही अडचण असल्यास किंवा कोणत्याही योजनेची माहिती हवी असल्यास १८००२६७०००७ या टोल फ्री क्रमांक वर संपर्क साधावा असे आवाहनही यावेळी डॉ.गावित यांनी केले.